# रोजगार हमी योजना समिती

## (२०१२-२०१३)

सत्यमेव जयते

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

## तेविसावा अहवाल

(सांगली जिल्ह्याच्या संबंधात)

(अहवाल दिनांक १५ एप्रिल, २०१३ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)

*

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई
२०१३

# रोजगार हमी योजना समिती

## (२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

## तेविसावा अहवाल

(सांगली जिल्ह्याच्या संबंधात)

(अहवाल दिनांक १५ एप्रिल, २०१३ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)

## रोजगार हमी योजना समिती
## (२०१२-२०१३)

**समिती प्रमुख**

(१) ॲड. सदाशिवराव पाटील, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्री. अनिल बावनकर, वि.स.स.
(३) श्री. वामनराव कासावार, वि.स.स.
(४) श्री. ओमप्रकाश पोकर्णा, वि.स.स.
(५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(६) श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.
(७) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.
(८) श्री. शिवेंद्रसिंह राजे भोसले, वि.स.स.
(९) श्री. राहूल मोटे, वि.स.स.
(१०) श्री. दिलीप वाघ, वि.स.स.
(११) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
***(१२) श्री ए. टी. पवार, वि.स.स.
*(१३) डॉ. खुशाल बोपचे, वि.स.स.
*(१४) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.
*(१५) श्री. संजय भेगडे, वि.स.स.
*(१६) प्रा. अतुल देशकर, वि.स.स.
(१७) ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.
(१८) कॅ. अभिजीत अडसूळ, वि.स.स.
(१९) श्री. विजयराज शिंदे, वि.स.स.
(२०) श्री. प्रविण दरेकर, वि.स.स.
(२१) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.
(२२) श्री. वसंतराव खोटरे, वि.प.स.
(२३) श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.
*(२४) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
(२५) श्री. भगवान साळुंखे, वि.प.स.
**(२६) डॉ. दिपक सावंत, वि.प.स., निमंत्रित

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. यु. के. चव्हाण, सहसचिव,
(३) श्री. जनार्दन विचारे, अवर सचिव (समिती).

**टीप.**—* डॉ. खुशाल बोपचे, सर्वश्री हरिष पिंपळे, संजय भेगडे व प्रा. अतुल देशकर, वि.स.स. यांची दिनांक २५ जुलै २०१२ रोजी मा. अध्यक्षांनी सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

** डॉ. दिपक सावंत, वि.प.स. यांची दिनांक २७ ऑगस्ट २०१२ रोजी मा. सभापतींनी निमंत्रित सदस्य म्हणून फेर नामनियुक्ती केली.

*** श्री. लक्ष्मण जगताप, वि.स.स. यांच्याऐवजी श्री. ए. टी. पवार, वि.स.स. यांची दिनांक ७ जानेवारी २०१३ रोजी मा. अध्यक्षांनी सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

# रोजगार हमी योजना समिती

## (२०१०-२०११)

**समिती प्रमुख**

(१) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्री. दिनानाथ पडोळे, वि.स.स.
(३) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
(४) श्री. सुरेशकुमार जेथलिया, वि.स.स.
(५) श्री. योगेंद्र भोये, वि.स.स.
(६) श्री. ओमप्रकाश पोकर्णा, वि.स.स.
(७) श्री. सिताराम घनदाट, वि.स.स.
(८) श्री. चंद्रकांत दानवे, वि.स.स.
(९) श्री. राहूल मोटे, वि.स.स.
(१०) श्री. दिलीप वाघ, वि.स.स.
(११) श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील, वि.स.स.
(१२) श्री. राजीव देशमुख, वि.स.स.
(१३) श्री. दादाराव केचे, वि.स.स.
(१४) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.
(१५) श्री. सिद्रामप्पा पाटील, वि.स.स.
(१६) श्री. शिवाजी कर्डिले, वि.स.स.
(१७) ॲड. आशिष जयस्वाल, वि.स.स.
(१८) श्री. संजय राठोड, वि.स.स.
(१९) श्री. विजयराज शिंदे, वि.स.स.
(२०) श्री. मंगेश सांगळे, वि.स.स.
(२१) श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.
*(२२) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
(२३) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.
(२४) श्री. केशवराव मानकर, वि.प.स.
**(२५) रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. यु. के. चव्हाण, सहसचिव,
(३) श्री. विलास आठवले, उप सचिव,
(४) श्री. श्रीकांत शेटे, कक्ष अधिकारी.

---

**टीप.—*** श्री. शिवाजीराव पाटील, वि.प.स. यांच्या सदस्यत्वाची मुदत दिनांक ७ जुलै २०१० रोजी समाप्त झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर, श्री. अनिल तटकरे, वि.प.स. यांची दिनांक १५ ऑक्टोबर २०१० रोजी मा. सभापतींनी सदस्य म्हणून नियुक्ती केलेली आहे.

** श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांनी दिनांक ७ जानेवारी २०११ रोजी त्यांच्या विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने अनुक्रमांक २५ वरील पद रिक्त दर्शविण्यात आले आहे.

## अनुक्रमणिका


| अ. क्र. (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना :** | |
| १. | कामाचे वार्षिक नियोजन | १ |
| २. | निधीचा पुरवठा व खर्च | ४ |
| ३. | मजुरांच्या सोयीसवलतींवर करण्यात आलेला खर्च | ७ |
| ४. | मजुरीचे वाटप | ८ |
| ५. | अपूर्ण कामे | ११ |
| ६. | गैरव्यवहाराची प्रकरणे | १५ |
| ७. | सामाजिक वनीकरण | १९ |
| | **परिशिष्ट :** | |
| | (एक) अपूर्ण कामे | २१ |
| | (दोन) गैरव्यवहाराची प्रकरणे | ४९ |
| | (तीन) बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | ५५ |

## प्रस्तावना

मी, रोजगार हमी योजना ''समितीचा प्रमुख'' या नात्याने समितीच्या अनुमतीने समितीचा तेविसावा अहवाल सादर करीत आहे.

मा. अध्यक्ष, विधानसभा व मा. सभापती, विधानपरिषद, यांनी अनुक्रमे दिनांक ३१ मे २०१२ व १ जून २०१२ रोजी नियुक्त केलेल्या सदस्यांची सन २०१२-२०१३ या वर्षासाठी समिती गठीत केली. यापूर्वीच्या समितीने दिनांक २१ व २२ सप्टेंबर, २०११ रोजी सांगली येथे झालेल्या बैठकीमध्ये समितीने पाठविलेली प्रश्नावली व जिल्हा बैठकीच्या वेळी समितीने रोहयोच्या कामात आलेल्या त्रुटी तसेच रोहयो अंतर्गत कामे करणाऱ्या मजुरांना आलेल्या अडचणी व ही योजना राबवितांना कार्यान्वयीन यंत्रणांना आलेल्या उणीवा व अडचणी याबाबत लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद व जिल्ह्यातील रोहयोची कामे करणाऱ्या कार्यान्वयीन यंत्रणेचे अधिकारी यांच्याशी चर्चा केली.

जिल्हा बैठकींमध्ये समितीसमोर आलेली प्रकरणे व कार्यान्वयीन यंत्रणेच्या अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने तसेच त्यांनी कामांच्या पूर्ततेसंबंधी दिलेल्या आश्वासनासंदर्भात प्रश्नावली तयार करून ती नियोजन विभागाकडे (रोहयो) पाठवून शासनाने त्याबाबत केलेल्या पूर्ततेबाबतची माहिती त्यांचेकडून समितीने मागविली. समितीला प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक २३ जानेवारी २०१३ रोजी प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांची साक्ष घेण्यात आली.

उपरोक्त अहवाल जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला आढळून आलेल्या त्रुटी तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेला आहे.

समितीच्या कामकाजाच्या वेळी करण्यात आलेल्या सहकार्याबद्दल, समितीचे सर्व सदस्य, जिल्ह्यातील लोक प्रतिनिधी, सांगली जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, पंचायत समित्यांचे सभापती, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली व योजनेच्या कार्यान्वयीन यंत्रणांचे सर्व अधिकारी यांची समिती आभारी आहे.

त्याचप्रमाणे प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांनी समितीच्या निमंत्रणावरून समितीच्या बैठकीस उपस्थित राहून समितीला जे सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने सदर अहवाल दिनांक ०८ एप्रिल, २०१३ रोजी विचारात घेतला व संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई
दिनांक : ०८ एप्रिल, २०१३.

**ॲड. सदाशिवराव पाटील,**
समिती प्रमुख,
रोजगार हमी योजना समिती.

# रोजगार हमी योजना समितीचा अहवाल

## (सांगली जिल्हा)

## १. कामाचे वार्षिक नियोजन :

रोजगार हमी योजना समितीचा दिनांक २१ व २२ सप्टेंबर, २०११ रोजी सांगली येथे झालेल्या बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील "कामाचे वार्षिक नियोजन" या संदर्भात समितीला सन २००५-०६, सन २००८-०९ आणि सन २००९-१० मध्ये वार्षिक नियोजन आराखडा सादर करण्यास विलंब झाला होता. त्या अनुषंगाने समितीने संबंधिताना विचारणा केली की, पुढील काळात वार्षिक नियोजन आराखडा सादर करण्यास विलंब होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी आपण कोणती उपाय योजना करणार आहात यावर जिल्हाधिकारी यांनी अशी माहिती दिली की, ज्या अधिकाऱ्यांनी वार्षिक आराखडा सादर करण्यास विलंब केला आहे. वार्षिक नियोजनाचे आराखडे सादर करण्यास यंत्रणेंकडून काही ठिकाणी ८ ते १५ दिवसांचा विलंब झालेला आहे. ज्या यंत्रणांनी विलंबाने आराखडे सादर केले आहेत, त्या संबंधित अधिकाऱ्याना ताकीद देण्यात आली आहे. पुढील काळात वार्षिक नियोजन आराखडा शासनाने ठरवून दिलेल्या कालावधीत सादर करण्यात यावा अशा सूचना दिलेल्या आहेत. वार्षिक नियोजन आराखडा तयार करावयाचा नाही आणि राज्यातील गरजु लोकांना काम उपलब्ध करून द्यावयाचे नाही ही जी अधिकाऱ्यांची भावना आहे ती क्षमा करण्यासारखी नाही. काम अपूर्ण असेल तर, समजू शकतो असे समितीने स्पष्ट केले व पुढे विचारणा केली की, सन २००३ ते २०११ या कालावधीत वार्षिक नियोजनाची आकडेवारी नियमानुसार ५ टक्के तरतुद करण्याची आवश्यकता असताना पाटबंधारे विभागाने शुन्य नियोजन केल्याचे दर्शविले आहे. त्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प) विभाग, यांनी माहिती दिली की, पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता हे समितीच्या बैठकीला उपस्थित नाहीत. जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधीक्षक अभियंताना बैठकीला उपस्थित राहण्याबाबत कळविले नव्हते काय? असे समितीने विचारले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सर्व संबंधितांना बैठकीस उपस्थित राहण्याच्या लेखी सूचना दिल्या आहेत. बैठकीच्या दिवशी सकाळी सुद्धा फोनवरून अधीक्षक अभियंता यांनी बैठकीला उपस्थित रहावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

सन २००३ ते २०११ या कालावधीत पाटबंधारे विभागाने नियोजन का केले नाही? तसेच या कालावधीत शून्य नियोजन दाखवण्याची कारणे काय आहेत? अशी समितीने विचारणा केली असता, कार्यकारी अभियंता, ल.पा.विभाग सांगली यांनी माहिती दिली की, नियोजनात ५ टक्के तरतुद करणे आवश्यक होते. जलसंधारण विभागाचे ५५ टक्के व पाटबंधारे विभागाचे ५ टक्के नियोजन करावयास पाहिजे होते, तसे केल्याचे दिसून येत नाही. त्यावर जिल्हाधिकारी यांनी माहिती दिली की, या संदर्भात दोन आढावा बैठक घेतल्या होत्या, त्यामध्ये स्पष्टपणे सूचना दिल्या होत्या की, ५५ अधिक ५ टक्के नियोजन करण्याची आवश्यकता आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ५ टक्के नियोजन न करण्याची कारणे काय आहेत याची माहिती द्यावी. त्यावर उपायुक्त यांनी सांगितले की, जलसंधारणबाबत नियोजन करण्यात आले आहे. पाटबंधारे विभागाचे ५ टक्के नियोजन केले नाही यासंदर्भात आढावा बैठक घेण्यात आली होती. त्यावेळी पाटबंधारे विभागात कर्मचारी कमी आहेत असे सांगण्यात आले होते.

याबाबत समितीने अशी विचारणा केली की, पाटबंधारे विभागात कर्मचारी कमी आहेत म्हणुन नियोजन केले नाही हे उत्तर समर्थनीय होऊ शकत नाही. १-२ वर्ष नियोजन केले नाही तर प्रस्तुत बाब समजून घेणे शक्य आहे. परंतु, लागोपाठ ९ वर्षे नियोजन करण्यात आले नाही. पाणी टंचाई, दुष्काळ या गोष्टी सांगुन येत नाही. यासाठी वेळेत नियोजन करण्याची आवश्यकता आहे. याबाबत पाटबंधारे विभागाने ५ टक्के कामाचे नियोजन करणे आवश्यक असताना सन २००३ ते २०११ या कालावधीत काहीही नियोजन करण्यात आले नाही. त्याचप्रमाणे या नियोजनाचा आढावा घेण्याची जबाबदारी आयुक्त कार्यालयाची असताना त्यांनी लक्ष दिले नाही. पाटबंधारे विभागातील अधिकाऱ्यांनी या कामाबाबत अक्षम्य दुर्लक्ष व दिरंगाई केली आहे. नियमबाह्य वर्तवणूक केलेली आहे. त्याचप्रमाणे पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता हे समितीच्या बैठकीला जाणुनबुजून गैरहजर राहिले आहेत. गैरहजर राहण्यासाठी त्यांनी जिल्हाधिकारी यांची परवानगी घेतली नाही. यासाठी त्यांच्यावर पाटबंधारे विभागाच्या सचिवामार्फत कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

खाजगी पडिक जमीन लागवड १४ हेक्टर असून एकूण कामे १५ आहेत. कामावर झालेला खर्च शुन्य असून एकूण मनुष्य दिवस शून्य व काम पुर्ण झाल्याचे नमूद केले आहे. हे कसे काय होऊ शकते याचा खुलासा करावा असे समितीने विचारले असता, उप-संचालक सामाजिक वनीकरण यांनी समितीला माहिती दिली की, ही कामे खाजगी वनीकरणातून करण्यात आलेली आहेत. १४ हेक्टर जमिनीवर १५ लाभार्थ्यांनी वनीकरणची कामे केली आहेत. त्या लाभार्थ्यांना अनुदान दिलेले नाही. या संदर्भातील प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. या १५ लाभार्थ्यांचे १.७५ लाख रुपयाचे अनुदान थकित आहे. ते अजून मिळालेले नाही. वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून वैयक्तिक लाभाची कामे केल्यामूळे मनुष्य दिवस विचारात घेण्यात आले नाहीत. समितीने अशी सूचना केली की, १.७५ लाख रुपयांचे

अनुदान मिळणार आहे. यासाठी किती मनुष्य दिवस लागले याची माहिती दिली पाहिजे तसेच सन २०११-२०१२ मध्ये १४ हेक्टर वर एकूण १५ कामे घेण्यात आल्याचे नमूद केले असून त्यापुढे शून्य दर्शविण्यात आले आहे. यासंदर्भात नोंद घेणे आवश्यक असल्याने यापुढे अशी नोंद घेण्यात यावी. यावर उप संचालक सामाजिक वनीकरण यांनी सांगितले की, समितीने केलेली सूचना मान्य आहे.

जिल्हा बैठकीत समितीला दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने समितीने दिनांक २३ जानेवारी २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. त्यावेळी प्रश्नावलीच्या माध्यमातुन विचारलेल्या प्रश्नाचा केलेला लेखी खुलासा विचारात घेण्यात आला. सन २००३ ते २०११ या कालावधीत कामाचा वार्षिक नियोजन आराखडयात पाटबंधारे विभागाची कामे ५ टक्के घेणे आवश्यक असताना नियोजन शून्य करण्याची कारणे काय? याबाबत जबाबदार असणाऱ्या सबंधित अधिकाऱ्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली. सन २००३ ते २०११ या कालावधीत पाटबंधारे विभागाची कामे रोजगार हमी योजना आराखडयात का घेतली नाहीत? याबाबत संबधित विभागाने असा खुलासा केला.

**(१)** कार्यकारी अभियंता, लघू पाटबंधारे विभागातंर्गत जी कामे सुरू होती त्यांच्या निविदा मंजूर असल्यामुळे ती कामे रोजगार हमी योजने मधून घेता आली नाहीत. म्हसवड उजवा कालवा कि.मी. क्र. १ कामाचे अंदाजपत्रक तयार केले असता (दरसूची २००८-०९) त्याचा कुशल भाग ९४ टक्के व अकुशल भाग ६ टक्के येतो. त्यामध्ये अकुशल काम कमी असल्यामुळे हे काम रोहयो अंतर्गत प्रस्तावित करता आले नाही. तसेच या विभागातंर्गत असणारा कर्मचारी रोहयो कामे करण्याकरिता कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे (स्था.स्तर), विभाग सांगली यांचेकडे वर्ग केला होता असे म्हटले आहे. परंतु, सदर विभागाने दिलेला खुलासा असमाधानकारक असल्याने सदर विभागावर कार्यवाही का करू नये अशी नोटीस दिनांक २० जानेवारी २०१३ रोजी दिली आहे.

तसेच सदर विभागाला या वर्षी मग्रारोहयो अंतर्गतची कामे घेणेबाबत सूचना केलेल्या आहेत. या विभागाने सन २०११-२०१२ या वर्षामध्ये मग्रारोहयो अंतर्गत रू.७७.४३ लाख इतके रूपयाचे काम केले असून ८२१६८ इतके मनूष्य निर्मिती करण्यात आलेली आहे.

**(२)** कार्यकारी अभियंता, सांगली पाटबंधारे विभाग, सांगली यांचा खुलासा खालीलप्रमाणे आहे.—

विभागाकडून सिंचन व बिगर सिंचनाद्वारे पाणी देण्याचे व्यवस्थापन करण्यात येते.त्या अनुषंगाने देखभाल व दुरुस्तीची कामे केली जातात. ही कामे आवश्यकतेनूसार व काही वेळा तातडीने करावी लागतात.त्यातील बरीच कामे कुशल प्रकारची असतात. त्यामुळे ही कामे रोजगार हमी योजना आराखडयात घेण्यात आली नाहीत. तथापि सांगली पाटबंधारे विभागाचा उपरोक्त खूलासा समाधानकारक नसल्याने त्यांच्यावर देखील कारवाई का करू नये अशी नोटीस दिनांक २० जानेवारी २०१३ रोजी दिली आहे. तसेच त्यांना मग्रारोहयो अंतर्गत सुक्ष्म जलसिंचन/ कालव्याचे दुरुस्ती, गाळ काढणे, इत्यादी कामे घेणेबाबत सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

**(अ)** खाजगी पडीक जमीन लागवड १४ हेक्टर असून एकूण कामे १५ आहेत. तसेच एकूण मनूष्य दिवस शून्य आहे. व काम पूर्ण झाले आहे.

सदरची कामे व्यक्तिगत लाभार्थ्याची होती तथापि याबाबत शासनाकडून अनूदान प्राप्त झाले नव्हते. शासनाने रक्कम वितरित न केल्यामूळे झालेला खर्च हा शून्य दर्शविण्यात आला आहे. तसेच सदर कामे ही शेतकऱ्यांनी व्यक्तिशः लाभार्थी म्हणून पूर्ण केली आहेत. त्यांचा झालेला खर्च हा झाडांच्या जिवंत पणाच्या टक्केवारीवर व्यक्तिगत लाभार्थी यांना दिला जातो. सदर योजना ही लाभार्थ्याने केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती योजना असल्यामूळे मनुष्यदिवस शुन्य दर्शविण्यात आलेले आहेत.

सन २०१०-२०११ मध्ये सामाजिक वनीकरण विभागामार्फत केलेल्या कामासंदर्भात शासनाकडे रु.२,५५,५९६ चा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यापैकी रु.८२,९७१ इतके अनुदान प्राप्त झाले व ते संबधितांना वाटप करण्यात आले आहे. तसेच उर्वरित रक्कम रु.१,७२,६२५, मे, २०१२ मध्ये प्राप्त झाले. ती सर्व रक्कम कार्यान्वित यंत्रणांनी लाभार्थ्यांना वाटप केली.

समितीने जिल्हा बैठकीच्या वेळी उपस्थित केलेल्या सन २००३ ते २०११ या कालावधीत कामाचे वार्षिक नियोजन आराखडयात पाटबंधारे विभागाची कामे ५ टक्के घेणे आवश्यक असताना नियोजन शुन्य करण्याची कारणे काय? यासंबंधी जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे. अशी विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, याबाबतीतील एमआयडी आणि एचआयडी या दोन्ही विभागाच्या बाबतीत आढावा घेतलेला आहे. सन २००३ मध्ये पाटबंधारे विभागाच्या स्टाफची तीन विभागामध्ये विभागणी केली होती. त्यानुसार तीन अभियांत्रिकी, १७ शाखा अभियंता आणि १७ तांत्रिक सहायक यांना रोजगार हमी योजनेच्या कामासाठी लघु पाटबंधारे विभागाकडे वर्ग करण्यात आले होते त्यांनी इरिगेशनच्या संबंधातील काम करावयाचे होते. रोजगार हमी योजनेचे काम लघु पाटबंधारे स्थानिक स्तर यांच्यामार्फत करण्यात आले आहे. याबाबतीत मागच्या वर्षी रोजगार हमी योजनेची कामे करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या, त्यानुसार सन २०११-१२ व २०१२-१३ मध्ये कामे केली आहेत.

कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभागामार्फत कोणती कामे सुरू आहेत? सदरहू काम अगोदर का हाती घेतले नाही? असे समितीने विचारले असता, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, सांगली यांनी सांगितले की, सद्या लघु पाटबधारे विभागामार्फत तलावातील गाळ काढण्याची कामे सुरू आहेत. सदरहू प्रकल्प आल्यानंतर ३३ कामांच्या संबंधातील एस्टीमेट जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविले होते. परंतु, मुख्य कालवा हा डोंगर आणि खडकाळ भागातून जात असल्यामुळे जिल्हापरिषदेने असे सदरहू काम निकषामध्ये बसत नाही. त्यामुळे सदरहू कामासंबंधिचा प्रस्ताव जिल्हा परिषद, स्थानिक स्तर विभागाकडे परत पाठविण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी यांच्या सुचनेनुसार लघु पाटबंधारे स्थानिकस्तराच्या कामांसाठी वेगळे कर्मचारी नेमले आहेत. त्या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातुन काही कामे सुरू झालेली आहेत. त्यामध्ये गाळ काढण्याच्या कामांचा देखील समावेश आहे. गाळ काढण्याची कामे रोजगार हमी योजनेच्या माध्यमातुन करता येत नव्हती काय? त्या काळामध्ये ६५ टक्के रोजगार हमी योजनेची कामे आवश्यक असताना याबाबतीत कोणत्याही प्रकारचे नियोजन करण्यात आले नाही. त्यावेळी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातुन सदरहू कामे प्रस्तावित करता येत नव्हती काय? असे समितीने विचारले असता, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, सांगली यांनी सांगितले की, सदरहु कामे प्रस्तावित करता आली असती. परंतु, त्यावेळी पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे तसेच याबाबतीत कायदेशीर अडचणी देखील होत्या. विभागातील कामे स्थानिक स्तराकडे वर्ग केली जात होती. त्यामुळे ही कामे हाती घेता आली नाहीत. यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, याबाबत संबंधितांकडुन प्राप्त झालेला खुलासा असमाधानकारक असल्यामुळे नोटीस दिली आहे. समितीने पुढे विचारणा केली की, याबाबतीत संबंधिताना दिनांक २० जानेवारी २०१३ रोजी नोटीस दिली आहे. या विषयांच्या अनुषंगाने संबंधित विभागाला साक्षीसाठी बोलाविले तेव्हा सदरहू नोटीस देण्यात आली आहे. याबाबतीत संबंधित अधिकाऱ्यांनी आढावा घेतला आहे काय? त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, याबाबत ऑगस्ट पासुन आढावा घेतलेला नाही.

समितीने सांगली जिल्ह्याच्या कामकाजाच्या अनुषंगाने भेट दिली होती. आणि काही सूचना केल्या होत्या. परंतु, त्याचे प्रशासनाला किती गांभीर्य आहे हे यावरून कळून येते.समितीच्या बैठकीच्यावेळी संबधिताकडून खुलासा मागविला होता. अधिकची माहिती घेतली होती. परंतु समितीने केलेल्या सुचनेप्रमाणे तेथील यंत्रणा काम करते की नाही, याचा देखील संबंधितांनी आढावा घ्यावयास पाहिजे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, रोजगार हमी योजनेच्या बाबतीत जिल्हास्तरिय समितीची १५ दिवसांनी बैठक घेण्यात येते आणि त्यावेळी रोजगार हमी योजनेच्या कामांची पुर्तता करण्याबाबत सूचना दिल्या जातात. परंतु, याबाबतीत विस्तृत स्वरुपामध्ये अहवाल प्राप्त झालेला नाही.

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ सप्टेंबर २०११ रोजी सांगली येथील जिल्हा बैठकीच्या वेळी जी आश्वासने देण्यात आली होती आणि त्याचे इतिवृत्त देखील प्राप्त झाले असेल अशा वेळी जर बैठकीमध्ये कामांच्या बाबतीत काही महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले असतील तर त्याबाबतीत आयुक्तांनी आपल्या स्तरावर संबंधितांनी केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेतला आहे काय? अशी समितीने विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, रोजगार हमी योजनेची ५५ कामे अपूर्ण असून एमआरईजीएस मधील ४ हजार कामे अपूर्ण आहेत. आाणि ती पूर्ण करण्याच्या दृष्टीने आढावा घेण्यासाठी विभागीय आयुक्तांनी १५ दिवसाच्या अंतराने बैठक घेतली आहे. परंतु, लघु पाटबंधारे विभागातंर्गत किंवा सांगली पाटबंधारे विभागातील कामे का पूर्ण झाली नाहीत याबाबत आढावा घेतलेला नाही. तो घ्यावयास हवा होता. जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सन २००३-०४ पासुन ३ अभियंता आणि १५ तांत्रिक स्थापत्य सहायक यांनी ४४ कामे हाती घेतली होती. प्रस्तुत खुलाशाने समितीचे समाधान झालेले नाही असे समितीने स्पष्ट केले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, याबाबत आतापर्यंत आढावा घेतलेला नाही मात्र आढावा घेऊन समितीला माहिती सादर करण्यात येईल.

समितीने सांगली येथे आल्यानंतर तेथील विविध कामाची तपासणी केली त्यांसंबंधातील अहवाल सादर केल्यानंतर सर्व काही संपले असे नाही. समितीने बैठकीमध्ये जे मुद्दे उपस्थित केले असतील किंवा सूचना केल्या असतील त्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली आहे. तसेच जर एखादी यंत्रणा शिथिल झाली असेल तर संबंधिताना सूचना दिल्या पाहिजेत आणि विविध योजनाच्या बाबतीत कामांच्या बाबतीत सुसुत्रता आणावयास पाहिजे असे समितीने स्पष्ट केले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, या विषयांच्या अनुषंगाने विविध कामांच्या पुर्ततेच्याबाबतीत संबंधितांचा १५ दिवसांमध्ये आढावा घेतो आणि त्याबाबत संबंधितांनी केलेला खुलासा मान्य करण्यासारखा आहे की नाही ही माहिती समितीला सादर करतो. तसेच उपायुक्त, रोहयो यांनी माहिती दिली की, जिल्हाधिकाऱ्यांना संबंधित व्यक्ती दोषी असल्याचे आढळुन आल्यानंतर त्यांनी सेक्शन ६ खाली कारवाई केली आहे.

येथील प्रशासनाने समितीच्या कामकाजाचे गांभीर्याने घेतलेले दिसत नाही. याठिकाणी सदरहू विभागाच्या कामकाजासंबंधात माहिती घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना बोलविल्यानंतर आपल्याला काही प्रश्न विचारले जातील. आणि त्याबाबत काही तरी सांगावे लागेल म्हणुन जर काही तरी

कारवाई केली जात असेल तर ते योग्य नाही. त्यांच्या कार्यक्षमतेबाबत शंका नाही पण याची दखल घ्यावी लागेल. पूर्वीची आकडेवारी आणि सादर करण्यात आलेली आकडेवारी वेगळी असून त्याबाबत सर्वांनीच नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे समितीला जी माहिती सादर करण्यात येत आहे, ती बरोबर आहे की नाही, हे आयुक्तांनी पहावयास पाहिजे तसेच या कामाच्या बाबतीत सुसुत्रपणा नाही असे समितीला वाटते.

खाजगी पडिक जमीन लागवड १४ हेक्टर असून एकूण कामे १५ आहेत. मात्र कामावर झालेला खर्च शून्य असून एकूण मनुष्य दिवसदेखील शुन्य आहेत. तसेच १५ लाभार्थ्यांचे रुपये १७५ लाखांचे अनुदान थकित आहे. याबाबत समितीला माहिती देण्यात यावी असे समितीने जिल्हा बैठकीच्या वेळी सांगितले होते. याबाबत सद्यःस्थिती काय आहे. अशी विचारणा केली असता, जिल्हाधिकारी यांनी माहिती दिली की, ही व्यक्तीगत लाभार्थी योजना होती. त्यावेळी जिवंत झाडांच्या टक्केवारीप्रमाणे लाभार्थ्यांना प्रतिपुर्ती दिली जात असे आणि तशी ती नंतर देण्यात आली आहे. सन २०१०-२०११ मध्ये सामाजिक वनीकरण या ठिकाणी टंकलेखनाची चूक झाली आहे. ती म्हणजे सदर थकित रक्कम ही १७५ लाख नसून ती १.७५ लाख इतकी रक्कम आहे. विभागामार्फत केलेल्या कामाच्या संदर्भात शासनाकडे रुपये २,५५,५९६ चा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यानुसार रुपये ८२,९७१ आणि उर्वरीत रुपये १,७२,६२५ इतकी रक्कम प्राप्त झाली आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, ही योजना वैयक्तिक लाभाची होती आणि संबंधितानी झाडे लावल्यानंतर त्यांना मदत करू असे आश्वासन दिले जाते, पण प्रत्यक्षात जगलेल्या झाडांच्या प्रमाणात त्यांना अनुदान दिले जाते. सन २०१०-२०११ मध्ये सामाजिक वनीकरण विभागामार्फत केलेल्या कामासंदर्भात शासनाकडे रुपये २,५५,५९६ चा प्रस्ताव पाठविण्यात आला होता. मात्र त्यापैकी रुपये ८२,९७१/- इतके अनुदान मिळाले आहे. सद्या झाडांची परिस्थिती काय आहे व किती झाडे जिवंत असतील अशी अपेक्षा आहे.यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सद्याच्या परिस्थितीत ४५ टक्के झाडे जिवंत आहेत. ४५ टक्के झाडे जिवंत असल्यामुळे त्यांचा हिशोब दिला नाही पण सुरूवातीला जेव्हा रिपोर्ट पाठविला होता. तेव्हा ७५ टक्के झाडे जिवंत होती. म्हणुन त्याचे पेमेंट केले आहे. असे असेल तर शासनाच्या धोरणाप्रमाणे एकंदर किती झाडे जिवंत असली पाहिजेत असे समितीने विचारले असता किमान ५० टक्के झाडे जिवंत असावयास पाहिजेत अशी जिल्हाधिकारी यांनी समितीला माहिती दिली.

**अभिप्राय व शिफारशी :**

**समितीला वार्षिक नियोजनाबाबत मोघम स्वरुपाची माहिती पुरविण्यात आली. सन २००५-२००६, २००८-०९ व २००९-१० चा वार्षिक नियोजन आराखडा तयार करून मंजुरी मिळविण्यास विलंब झालेला असल्याने विकासाच्या कामावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला, त्यामुळे जिल्ह्याच्या विकासावर दुरगामी परीणाम होतो याची जाणीव संबंधितांमध्ये दिसून आली नाही. यास्तव समिती तीव्र नाराजी व्यक्त करते व सदर प्रकरणात विलंब लावणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात यावी व या प्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

**२. निधीचा पुरवठा व खर्च :**

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ सप्टेंबर, २०११ रोजी सांगली येथे झालेल्या बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील "निधीचा पुरवठा व खर्च" या संदर्भात समितीने विचारणा केली की, ग्रामीण पाणीपुरवठा,जि.प., उप विभागीय वन अधीक्षक या यंत्रणांनी मजूरांच्या मजूरीकरिता खर्च झालेली रक्कम व त्यांची एकुण खर्च रकमेशी टक्केवारी पुस्तकात दिली असून या संदर्भात विवरणपत्रात नमूद केलेली आकडेवारी एकच असल्याने याबाबत माहिती देण्यात यावी. यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, समितीला सुधारीत पुस्तिकेद्वारे माहिती देण्यात आली आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांची २५.११ ही दर्शविण्यात आलेली टक्केवारी प्रत्यक्षात ४.१२ आहे. जिल्हा परिषद यांची दर्शविण्यात आलेली १२.९५ ही टक्केवरी प्रत्यक्षात २.८९ अशी आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, मजूराच्या मजूरीकरिता खर्च झालेल्या रकमेची एकूण खर्च रकमेशी सन २००३-०४ मध्ये २८९.३१; सन २००४-०५ मध्ये ४०८.६९ व सन २००५-०६ मध्ये ६९९.४३ दर्शविण्यात आली असल्याने ही टक्केवारीची माहिती चुकीची देण्यात आली आहे काय? ज्या यंत्रणांच्या अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली असेल, त्या संबंधित अधिकाऱ्यांवर जिल्हाधिकारी यांनी कारवाई केली पाहिजे. तसेच बुकलेटमध्ये दिलेली टक्केवारी चुकीची असल्याने ती दुरुस्त करून घ्यावी. त्याचप्रमाणे यंत्रणेकडुन जी माहिती येते ती बुकलेटमध्ये छापण्यात येते. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या माहितीवर विधानमंडळात साक्ष होते. तेव्हा जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती सत्य असल्याचे प्रमाणपत्र त्यांच्याकडून घ्यावे. यावर जिल्हाधिकारी यांनी माहिती दिली की, सुधारणा करण्यात आलेले पुस्तक देण्यात आले आहे. आढावा बैठक घेताना दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. सुधारणा केलेली माहिती बरोबर आहे. समितीने दिलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

समितीने पुढे विचारणा केली की, लघु पाटबंधारे विभाग, स्थानिक स्तर या यंत्रणेने शासनाकडे रुपये २९.५८ लाख इतक्या रकमेची मागणी केली आहे. शासनाकडुन रुपये ४९.३५ लाख इतका निधी प्राप्त झालेला आहे. आणि तेवढाच निधी खर्च झालेला आहे. त्यामुळे मागणी व पुरवठा यामध्ये तफावत का दिसुन येते? त्यावर कार्यकारी अभियंता यांनी माहिती दिली की, तांत्रिक चुक झालेली आहे. यंत्रणेने शासनाकडे रुपये ४९.३५ लाख इतक्या रकमेची मागणी केली. यंत्रणेला रुपये ४९.३५ लाख रुपये रक्कम प्राप्त झाली. हा सर्व निधी कुशल कामांवर खर्च झालेला आहे.

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या जिल्हा बैठकीत समितीला दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने समितीने दिनांक २३ जानेवारी, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. जिल्हा बैठकीच्या अनुषंगाने विभागाने पुरविलेल्या आश्वासित माहितीच्या संदर्भात समितीने विचारणा केली की, जिल्हा बैठकीच्या वेळी माहिती पुस्तिकेत मजूरीवरील खर्च, सोईसुविधांवरील खर्च व कुशल बाबींवरील खर्च शून्य दाखविला होता. याबाबत जिल्हाधिकारी यांनी माहिती दिली की, समितीच्या भेटीच्या वेळी सुधारीत माहिती सादर करण्यात आली होती.

आतापर्यंत चर्चा झालेल्या जवळजवळ सर्वच प्रश्नांच्या लेखी माहितीमध्ये चुकीची माहिती नमूद करण्यात आली आहे. तसेच खुलासा स्वीकारण्यास नम्र विनंती आहे. असे नमूद केले आहे. प्रत्येक वेळी असे वाक्य टाकणे योग्य नाही. माहिती पुस्तिकेतील माहिती बरोबर आहे की नाही हे तपासावयास हवे होते. समितीच्या भेटीच्या वेळी जिल्हाधिकारी कार्यालयाने जी माहिती सादर केली होती ती चुकीची होती. त्या बाबत समिती प्रमुखांनीसुद्धा नाराजी व्यक्त केली होती. याचाच अर्थ अधिकारी समितीला गांभीर्याने घेत नाहीत असे दिसते. अधिकाऱ्यांचा खुलासा स्वीकारण्यास समितीला हरकत नाही. परंतु एखाद्या दुसऱ्या मुद्याच्या बाबतीत ठिक आहे. परंतु प्रत्येक मुद्याच्या बाबतीत समितीकडून खुलासा मान्य करणे अभिप्रेत नसावे. ज्यांनी अशा प्रकारच्या चुका केल्या आहेत किंवा ही माहितीपुस्तिका योग्य प्रकारे तयार झाली आहे की नाही हे तपासण्याची ज्यांची जबाबदारी होती त्यांच्यावर कारवाई केली आहे काय? कारण ठराविक लोकांच्या चुकांमुळे आपला आणि समितीचा वेळ वाया जात आहे. मला वाटते या नंतर माहिती पुस्तिकेतील माहिती अचूक कशी राहिल या दृष्टीने आपण काळजी घ्यावी. असे समितीने स्पष्ट केले.

उप संचालक, सामाजिक वनीकरण यांनी मजूरांच्या मजूरीकरिता रु.१८०.७० इतकी रक्कम खर्च झाली असून मजूरांच्या सोयी सवलतीकरिता कोणतीही रक्कम खर्च न करण्याची कारणे काय? असे समितीने विचारले असता, विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला आहे :—

सामाजिक वनीकरण विभाग, सांगली यांना सन २०१०-०११ मध्ये एकूण रक्कम रू.१.०५ लाख इतका निधी वितरीत करण्यात आला. त्यापैकी ०.९४ लाख इतकी रक्कम मजूरांच्या मजूरीकरिता खर्च झाली. तथापि तांत्रिक चुकीने त्याची टक्केवारी १८०.७० इतकी प्रथम पुस्तिकेत (पान १३) दर्शविणेत आली व रक्कम रू. ०.११ लाख ही कुशल बाबीवर खर्च झालेली असून त्याची टक्केवारी १०.४८ टक्के ही बरोबर दर्शविली आहे. दुरूस्ती प्रपत्रकामध्ये मजूरीवरील खर्चाची टक्केवारी नजर चुकीने लिहित नाही. तथापि ती ८९.५२ टक्के इतकी आहे.

या कालावधीत घेण्यात आलेली कामे ही खाजगी पडीक जमीन वृक्ष लागवडीची असल्याने लाभार्थ्यांना झालेल्या कामाचे अनुदान वितरीत केले आहे. लाभार्थी यांनी स्वतःच्या शेतात केलेल्या वृक्ष लागवडीवरील खर्चाची परिपूर्ती केलेली आहे. त्यामुळे मजूरांच्या सोयी सवलतीवर वेगळा खर्च झालेला नाही.

याबाबत बैठकीच्या वेळी जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, ही वैयक्तिक लाभाची योजना होती. सदरहू योजना लाभार्थ्यांनी केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्याबद्दलची असल्यामुळे मजूरांना सोयी सवलती देण्याचा प्रश्न येत नाही. त्यामुळे मजूरांच्या सोयी सवलतीवरील खर्च शून्य नमूद करण्यात आला होता.

ल.पा.वि.(स्था.स्तर) यंत्रणेने शासनाकडे रू. २९.५८ लाख इतक्या निधीची मागणी केली व प्रत्यक्षात शासनाने रू ४९.३५ इतक्या निधीची केलेली पूर्तता. त्यामुळे मागणी व पुरवठ्यामध्ये तफावत असणे. याबाबत समितीने विचारणा केली असता, विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला आहे.

सन २०१०-११ या वित्तीय वर्षाच्या गोषवाऱ्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे मागणी केलेल्या निधीची रक्कम या रकान्यामध्ये रक्कम रु. २९.५८ लाख आणि शासनाने मंजूर केलेल्या निधी व यंत्रणेकडून खर्च झालेला निधी या रकान्यामध्ये रक्कम रू. ४९.३५ लाख नमूद केली आहे. त्यामध्ये शासनाकडे केलेली मागणी व शासनाने दिलेला निधी या रकान्यांत तफावत दिसत असल्याने समितीने या तफावतीबाबत विचारणा केली आहे. सन २००९-१० या वित्तीय वर्षात रक्कम रू. २१.२५ लाख व सन २०१०-११ या वित्तीय वर्षात रक्कम रू. २८.१० लाख अशी एकूण रक्कम ४९.३५ लाख पतमर्यादेच्या मागणी पैकी रक्कम रू ४९.३५ लाख ही रक्कम सन २०१०-११ या वित्तीय वर्षात प्राप्त झालेली आहे. त्यामुळे सन २०१०-११ च्या गोषवाऱ्यात मागणीपेक्षा प्राप्त रक्कम अधिक दिसत आहे. ती पुढीलप्रमाणे आहे :—

| अ.क्र. | पतमर्यादा मागणी वर्ष | जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मागणी केलेली पतमर्यादा पत्र व दिनांक | मागणी (रु.लाखात) | शासनाकडून प्राप्त पतमयार्दा | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शासन आदेश दिनांक | प्राप्त रक्कम (रु.लाखात) | |
| १ | २००९-१० | २४/२/२०१० | ५.८८ | | | सन २००९ या वर्षात पतमर्यादा प्राप्त झालेली नाही. |
| २ | | २४/२/२०१० | १.०२ | | | |
| ३ | | २४/२/२०१० | ३.२० | | | |
| ४ | | २४/२/२०१० | ७.४६ | | | |
| ५ | | ०२/३/२०१० | ०.८५ | | | |
| ६ | | २८/५/२०१० | २.८४ | | | |
| **एकूण** | | | **२१.२५** | | | |
| १ | २०१०-११ | | | २८/४/२०१० | ४.२२ | सन २००९-१० मध्ये मागणी केलेली पतमर्यादा रक्कम रुपये २१.२५ लाख सन २०१०-११ या वित्तिय वर्षात प्राप्त झालेली आहे. |
| २ | | | | २८/४/२०१० | १.६६ | |
| ३ | | | | २८/४/२०१० | १.०२ | |
| ४ | | | | २८/४/२०१० | ३.२० | |
| ५ | | | | २८/४/२०१० | ७.४६ | |
| ६ | | | | २८/४/२०१० | ०.८५ | |
| ७ | | | | २८/४/२०१० | २.८४ | |
| **एकूण** | | | | | **२१.२५** | |
| १ | २०१०-११ | १७/५/२०१० | २.१८ | २८/६/२०१० | २.१८ | |
| २ | | ७/६/२०१० | ६.६४ | २८/७/२०१० | ६.६४ | |
| ३ | | २७/७/२०१० | ९.९३ | २०/९/२०१० | ९.९३ | |
| ४ | | २६/८/२०१० | २.०७ | १९/१०/२०१० | २.०७ | |
| ५ | | १४/०२/२०११ | २.६७ | १६/३/२०११ | २.६७ | |
| ६ | | २२/०२/२०११ | ५.११ | १६/३/२०११ | ५.११ | |
| | | **एकूण** | **२८.१०** | | **२८.१०** | |
| | | **एकूण एकंदर** | **४९.३५** | | **४९.३५** | |

**अभिप्राय व शिफारशी :**

**(१) एमआरईजीएस योजना देशभरात सुरू केल्यानंतर देशातील सर्व राज्यांनी त्याची अंमलबजावणी तातडीने केली. महाराष्ट्र राज्यात रोजगार हमी योजना सुरू असल्याने मग्रारोहयो अंतर्गत अद्याप पाहिजे तसे काम सुरू झालेले नाही असे समितीला प्रकर्षाने जाणवले, राज्यामध्ये मग्रारोहयो अंतर्गत कामाचे नियोजन मोठ्या प्रमाणात करणे आवश्यक आहे आणि त्यासाठी जास्तीत जास्त निधी केंद्र शासनाकडून मिळविण्याच्या दृष्टीने शासनामार्फत पाठपुरावा करण्यात यावा अशी समितीची आग्रही शिफारस आहे.**

**समितीला अचूक व योग्य माहिती देण्यात आली नाही. माहितीमध्ये असंख्य चूका दिसून आल्या आहेत. त्यामुळे समिती तीव्र नाराजी व्यक्त करते.**

**(२) समितीला बैठकीच्या वेळी पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेमध्ये मोठ्या प्रमाणावर चुका होत्या त्यामुळे समितीचा अमुल्य वेळ वाया गेला. या माहिती पुस्तिकेत दिलेली चुकीची माहिती ज्या अधिकाऱ्यांनी दिली होती त्यांच्यावर कारवाई करण्याचे**

**आदेश समितीने दिले असतानाही सचिवांच्या साक्षीच्या वेळी याबाबत कोणतीही कठोर कारवाई केली असल्याचे आढळून आले नाही. ही बाब अंत्यत गंभीर असून याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे. याबाबत शासनाने लक्ष घालून सर्व संबंधितांवर कारवाई करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**३. मजुरांच्या सोई सवलतीवर करण्यात आलेला खर्च :**

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ सप्टेंबर २०११ रोजी सांगली येथे झालेल्या बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील "मजूरांच्या सोई सवलतीवर करण्यात आलेला खर्च" या संदर्भात समितीने विचारणा केली की, सन २००३ मध्ये तसेच सन २००६-०७ मध्ये मजूरांच्या सोयी सवलतीवरील खर्चामध्ये मजूरांच्या लहान मुलांना सांभाळण्यासाठी दाखविलेला खर्च हा पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी तसेच इतर खर्चाच्या प्रमाणात अधिक दिसत आहे. ल.पा.वि.स्था.स्तर या यंत्रणेने कामासाठी एक हजार मजूर दाखविले आहे. त्याच्याकरीता पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी नेमलेल्या मजूरांवरील खर्च रूपये ०.५ हजार इतका दर्शविण्यात आला आहे. यावर कार्यकारी अभियंता, लघू पाटबधारे विभाग (स्था.स्तर) यांनी सांगितले की, जी एक हजार मजूर संख्या दिलेली आहे ती मजूर संख्या नसून ते मनूष्य दिवस आहेत. "मजूर" असा उल्लेख केलेला असताना तो "मनुष्य दिवस" आहे हे कसे समजायचे. जर चूक झाली असेल तर ती दुरुस्त करावयास नको काय असे समितीने विचारले असता, कार्यकारी अभियंता, ल.पा.वि.(स्था.स्तर) यांनी समितीला असे सांगितले की, त्यांच्याकडून सांगण्यात चूक झाली आहे. एक हजार मजूर आहेत. आणि पन्नास हजार रुपये खर्च झालेला आहे.

सन २०१०-२०११ मध्ये सामाजिक वनीकरण या यंत्रणेने रुपये एक लाख पाच हजार इतका खर्च दाखविला आहे. परंतु या यंत्रणेने मजूरांच्या सोईसवलतीवर शुन्य खर्च दर्शविला असल्याने यंत्रणेने मजूराच्या सोईसवलतीवर खर्च केला नाही काय? असे समितीने विचारले असता, उप संचालक सामाजिक वनीकरण यांनी सांगितले की, सदरहू अनुदान खाजगी पडीक जमिनीवरील लागवडीसाठी असून सदर कामावर १ लाख ०५ हजार रुपये खर्च झाला आहे. समितीने पुढे विचारणा केली की, मजूरांच्या मजूरीकरीता खर्च झालेली रक्कम ०.९४ व त्याची एकूण खर्च रकमेशी टक्केवारी १८०.७० इतकी दर्शविण्यात आली आहे. परंतु मजूरांच्या सोईसवलतीवरील खर्च निरंक दाखविलेला असल्याने मजूरांच्या सोईसवलतीवर खर्च केला नाही काय? यावर उप संचालक, सामाजिक वनीकरण यांनी माहिती दिली की, या योजनेतंर्गत लाभार्थ्यांनी स्वतः काम केलेले आहे. खाजगी पडीक जमिनीवर लागवड केली आहे. लाभार्थी खाजगी असला तरी त्याला मजूर म्हणून धरण्यात येते. तेव्हा त्याला सोईसवलतीचा लाभ का दिला नाही? व या संदर्भात विभागाचे मत काय आहे.अशी समितीने विचारणा केली असता, उप संचालक, सामाजिक वनीकरण यांनी सांगितले की, अंदाजपत्रकात तशी तरतूद केलेली नाही.

मजूरांना काम मिळावे म्हणून त्यांना रोजगार हमी योजनेमार्फत काम देण्यात येते. तेव्हा रोजगार हमी योजनेवरील मजूरांना पिण्याचे पाणी पुरविणे व अन्य सुविधा पुरविणे आवश्यक आहे. मजूरांच्या सोईसवलतीवर एकूण खर्चाच्या ३.०० टक्के खर्च झाला पाहिजे. नियमानुसार जे देय आहे त्याची तरतूद अंदाजपत्रकात केली पाहिजे. जर कामावर १ लाख रुपये खर्च झाला असेल तर मजूरांच्या सोईसवलतीवर ३.०० टक्केप्रमाणे ३ हजार रुपये खर्च होणे आवश्यक आहे. असे समितीने स्पष्ट केले असता, संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले की, लाभार्थी स्वतःच काम करीत असल्यामुळे कदाचित वेगळी सवलत दिली नसेल. हा सर्व खर्च धरुन लाभार्थ्याला रक्कम दिलेली आहे.

अंदाजपत्रकात तशी तरतूद नाही अशी संबंधितांनी समितीला असत्य माहिती देवू नये असे समितीने स्पष्ट केले असता, उपसंचालक, सामाजिक वनीकरण यांनी सांगितले की, त्यांच्याकडून माहिती देण्यामध्ये चूक झाली असल्याने त्याबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त करून अशी माहिती दिली की, लाभार्थ्याला एकूण १ लाख ५ हजार रुपये रक्कम देण्यात आली. या रक्कमेमध्ये मजूरांच्या सोईसवलतीवरील रुपये २७००-चा (२.७० टक्केप्रमाणे) देखील समावेश आहे.

करोली एम यल्लमा देऊळ ते तोडकर वस्ती रस्ता करणे या कामावर मजूरांच्या सोई सवलतीवर ३.७१ टक्के रक्कम खर्च करण्यात आलेली आहे.जादा रक्कम खर्च करण्याचे कारण काय?असे समितीने विचारले असता, कार्यकारी अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, मिरज यांनी माहिती दिली की, सदरहू कामाचे अंदाजपत्रक २ लाख ८० हजार रूपयांचे असून त्यापैकी रूपये ४९ हजार इतकी रक्कम प्राप्त झाली व तेवढाच निधी कामावर खर्च झालेला आहे. त्यासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, नियमाप्रमाणे मजूरांच्या सोयी सवलतीवर ३ टक्के खर्च पाहिजे. याठिकाणी ३.७१ टक्के खर्च झालेला आहे. जादा खर्च करण्याचे कारण काय? भोसे नंदनवन हॉटेल ते कुंभारमळा रस्ता करणे तसेच पाटगांव ते सोनी कारखाना रस्ता करणे या दोन्ही कामांवर मजूरांच्या सोयी सवलतीवर ५.३९ टक्के रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. म्हणजे २.३९ टक्के रक्कम जास्त खर्च केलेली आहे. हा जास्तीचा खर्च करण्याची कारणे काय आहेत? यावर उप संचालक, सामाजिक वनीकरण यांनी अशी माहिती दिली की, कामाच्या सुरूवातीला पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी थोडा जास्त खर्च होतो.

जिल्हा बैठकात दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने समितीने प्रश्नावलीच्या माध्यमातून कार्यकारी अभियंता, लघू पाटबंधारे (स्था.स्तर) या यंत्रणेने सन २००३ व २००६-०७ मध्ये मजूरीच्या सोई सवलतीवरील खर्चामध्ये चुकीची माहिती समितीला सादर केली असल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणते कारवाई करण्यात आली? अशी समितीने विचारणा केली असता पुढील प्रमाणे माहिती देण्यात आली.

कार्यकारी अभियंता ल.पा.(स्थानिक स्तर) विभाग, सांगली यांनी सन २००३ या वित्तीय वर्षामध्ये मजूरांच्या सोईसवलतीवर रक्कम रुपये ७.५० लाख खर्च दर्शविला असून मजूर या रकान्यामध्ये १००० मनुष्य दिवस आणि सन २००६-०७ मध्ये रक्कम रुपये ०.१७ लाख खर्च व ४०० मनुष्य दिवस दर्शविलेले आहे. यंत्रणेने मजूर या रकान्यामध्ये मजूर संख्या नमूद करण्याऐवजी मनुष्य दिवस नमूद केलेले आहे. सदरची चूक ही तांत्रिक चूक आहे. सदर बाबतचा खुलासा समितीच्या बैठकीमध्ये सांगण्यात आलेला आहे. यामध्ये समितीला चुकीची माहिती सादर करण्याचा कोणताही दुहेतू नव्हता असे स्पष्टीकरण सादर केले.

समितीच्या दिनांक २१ व २२ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या जिल्हा बैठकीत समितीला दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने दिनांक २३ जानेवारी, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. या बैठकीत विभागाने पुरविलेल्या आश्वासित माहितीच्या संदर्भात समितीने विचारणा केली की, माहिती पुस्तिकेमध्ये मजूरीवरील खर्च, सोई-सुविधांवरील खर्च व कुशल बाबींवरील खर्च शुन्य दाखविला असल्याने त्याबाबत माहिती द्यावी. यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, समितीच्या भेटीच्या वेळी सुधारित माहिती सादर करण्यात आली होती.

**अभिप्राय व शिफारशी :**

**मजूरांच्या सोईसवलतीवर खर्च करण्यासाठी शासन निर्णयानुसार एकूण खर्चाच्या ३ टक्के इतकी रक्कम खर्च करण्यास अनुमती देण्यात आली आहे. परंतु समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, सन २००३ व २००६-२००७ या वर्षात ३ टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम मजूरांच्या सोईसवलतींवर विविध यंत्रणाद्वारे खर्च करण्यात आली आहे. ३ टक्क्यापेक्षा जास्त रक्कम खर्च करणे हे नियम बाह्य आहे. त्यामुळे मजूरांना शासन निर्णयानुसार विहित मर्यादेत सोईसवलती पुरविण्याबाबत सांगली जिल्ह्यातील सर्व यंत्रणांनी योग्यरित्या काळजी घेतलेली नाही ही बाब गंभीर आहे. तरी पुढील कालावधीत अशी चूक संबंधिताकडून होणार नाही याची काळजी घेण्याची समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

**४. मजूरीचे वाटप :**

दिनांक २१ व २२ सप्टेंबर २०११ रोजी सांगली येथे झालेल्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील "मजूरीचे वाटप" याबाबत समितीने विचारणा केली की, मजूरी वाटपाच्या संदर्भात पुस्तकातील तक्त्यामध्ये माहिती निरंक असल्याचे नमूद केले आहे. मजूरी वाटपाच्या तक्त्यामध्ये माहिती निरंक असण्याची कारणे काय आहेत. मागील ७-८ वर्षात मजूरीचे वाटप झालेले नाही काय? सन २००३-०४ मध्ये सांगली जिल्ह्यात रोजगार हमी योजनेची किती कामे झाली होती ? त्या कामावर किती खर्च झाला होता. संपुर्ण राज्यात रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजूरांना मजूरी वाटप करण्यास विलंब होतो. फक्त सांगली जिल्ह्यात मजूरांना मजूरी वाटप करण्यास विलंब झालेला नसल्याचे दिसते. याबाबत वस्तुस्थिती काय आहे. याची माहिती समितीला देण्यात न आल्याने ही माहिती सचिवांच्या साक्षीच्या वेळी सादर करावी अशी सूचना केली.

समितीला दिलेल्या आश्वासनावरील माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २३ जानेवारी २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सन २००३ ते २०१०-२०११ पर्यंत मजूरी वाटपास झालेल्या विलंबाची माहिती सादर करण्यास सांगितले होते. जिल्ह्यात मजूरी वाटपाची काय स्थिती आहे ? यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, समितीच्या भेटीच्या वेळी विभागांनी मजूरी वाटपास झालेल्या विलंबाची माहिती निरंक कळविली होती. मात्र जत आणि आटपाडी तालुका वगळता उर्वरित तालुक्यामध्ये ३१ डिसेंबर पर्यंत मजूरीचे वाटप करण्यात आले आहे. मजूरी वाटपास १५ दिवसांपेक्षा जास्त विलंब होऊ नये. याची दखल घेण्यात आली आहे. जत आटपाडी आणि कवठेमहांकाळ या तालुक्यामध्ये रोजगार हमी योजनेची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. मजूरीच्या हजेरीपटाबाबत त्या ठिकाणी कामे सुरू असून त्यांनी स्वतः व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी माहिती घेतली आहे. मजूरी वाटप प्रलंबित असलेल्या जत आणि आटपाडी तालुक्यातील १-२ ग्रामपंचायतींनी अलीकडेच हजेरीपट सादर केल्यामुळे मजूरीचे वाटप प्रलंबित असल्याचे दिसते. तसेच संबंधित ग्रामसेवकांनी विहीत मुदतीत हजेरीपट सादर केले नव्हते म्हणून त्यांना निलंबित केले होते. उपायुक्त, रोजगार हमी योजना यांनी अशी माहिती दिली की, जिल्हाधिकारी कार्यालयाने जतच्या ग्रामसेवकाला निलंबित केले होते. या प्रकरणी त्यांनी तीन अभियंत्यांच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव पाठविला आहे. त्यांनी स्वतः व जिल्हाधिकारी यांनी त्या अधिकाऱ्यांनी विचारले होते की, मजूरीचे हजेरीपट ३१ ऑगस्टपर्यंत सादर करावयाचे असताना सुद्धा त्यांनी ते का केले नाही. सांगली जिल्ह्यात २ ऑक्टोबर २०१२ पासुन ई-मस्टर पद्धत सुरू करण्याचे नियोजन होते. त्यामुळे सर्व हजेरी पट ३१ ऑगस्ट पुर्वी सादर करावेत अशा सूचना दिल्या होत्या. तरी सुद्धा जत आणि आटपाडी तालुक्यातील अभियंत्यांनी आवश्यक ते मोजमाप घेतले नाही. ई-मस्टर संदर्भातील सर्व कामकाज बंद केल्यानंतर त्यांनी हजेरी पट सादर केले. मजूरी वाटपास विलंब झाल्यामुळे कारवाई प्रस्तावित केली. त्यावर जिल्हाधिकारी, सांगली यांनी सांगितले की, हा प्रश्न २-३ गावांतील आहे. इतर तालुक्यांनी याबाबत १०० टक्के दखल घेतली आहे. राज्यात सांगली हा पहिला जिल्हा आहे की, ज्या जिल्ह्याने ई-मस्टर पद्धत सुरू केली आहे.

विभागीय सचिवांनी समितीला अधिकची अशी माहिती दिली की, सर्वात अगोदर रोजगार हमी योजनेच्या बाबतीत ई-मस्टर पद्धत सांगली जिल्ह्यात सुरू झाली आहे. वाळवा तालुक्यातील गटविकास अधिकाऱ्याच्या माध्यमातून ई-मस्टर पद्धतीचा उपक्रम सुरू केला गेला. त्या ठिकाणी प्रशिक्षण वर्ग सुद्धा सुरू केले आहेत. राज्यातून वेगवेगळे गट त्या ठिकाणी प्रशिक्षणासाठी पाठविले जातात. मजूरी वाटपासंबंधी विलंब होत असल्याबाबतचा मुद्दा अनेकदा उपस्थित केला जातो. मागील दोन वर्षात या योजनेवरील काम मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. पूर्वीच्या रोलींग फंड पद्धतीमुळे मजूरी वाटपास विलंब होत होता. त्यामुळे १ एप्रिल पासुन हजेरी पट ट्रॅकर सुरू केले आहे. त्यानुसार १५ दिवसांत हजेरीपट आले नाही तर संबंधित गटविकास अधिकाऱ्यांना विचारले जाते. नवीन पद्धतीनुसार गटविकास अधिकारी व तहसिलदार यांच्या खात्यामध्ये निधी जमा करून मजूरांच्या मजूरीची रक्कम डि.डी.द्वारे संबंधित पोस्ट ऑफिससबपोस्ट कार्यालयामध्ये जमा करण्यात येते.

डिसेंबरच्या अधिवेशनात सोलापूर जिल्ह्याच्या बाबतीत तक्रार करण्यात आली होती. त्याबाबतची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी विभागीय आयुक्तांनी त्या ठिकाणी भेट दिली आहे तेथे सदर यंत्रणा हजेरीपट तयार करण्यास विलंब लावतात. ज्या ठिकाणी मजूरी वाटपास १५ ते ३० दिवसांचा विलंब होत असेल, तर त्याबाबतची माहिती यंत्रणा व हजेरीपटाच्या क्रमांकासह जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी अशा सूचना दिल्या आहेत. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, नोव्हेंबर अखेर पर्यंत कोणकोणत्या तालुक्यांचे पेमेंट केलेले आहे. जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, जत आणि आटपाडी तालुक्यातील १-२ ग्रामपंचायती वगळता उर्वरीत ग्रामपंचायतीमध्ये मजूरीचे वाटप झाले आहे. उपरोक्त २ तालुके वगळता उर्वरीत तालुक्यात ३१ डिसेंबर पर्यंतची मजूरी वाटप झालेली आहे.

समितीने असे निदर्शनास आणले की, कायद्यानुसार रोजगार हमी योजनेवरील मजूरांना ७ ते १५ दिवसांत मजूरीचे वाटप केले पाहिजे. विभागीय सचिवांनी सांगितले की, पूर्वीच्या पद्धतीनुसार मजूरी वाटपास विलंब होत होता. समितीचे मत आहे की, आपण नवीन पद्धत स्वीकारल्यामुळे भविष्यात अशा प्रकरचा विलंब होता कामा नये. याबाबत काळजी घ्यावयास पाहिजे. यावर जिल्हाधिकारी यांनी असे मत मांडले की, (१) जत व वाळवा तालुक्यात ३१ डिसेंबर, (२) आटपाडी तालुक्यात ५ जानेवारी, (३) कवठेमंहाकाळ तालुक्यात ६ जानेवारी, (४) सांगली तालुक्यात ११ जानेवारी, (५) कडेगांव तालुक्यात १२ जानेवारी, (६) शिराळा तालुक्यात १३ जानेवारी, पर्यंत मजूरीचे वाटप झालेले आहे.जत आणि आटपाडी तालुक्यातील २-३ ग्रामपंचायती वगळता उर्वरीत ठिकाणी सर्व पेमेंट झालेले आहे.

रोजगार हमी योजनेची सर्वात जास्त कामे आटपाडी, जत आणि कवठेमहांकाळ या तालुक्यांमध्ये सुरू आहेत हे तालुके अति दुष्काळी आहेत. असे असताना ई-मस्टर पद्धत सर्वप्रथम वाळवा तालुक्यात सुरू करण्यामागील कारण काय आहे? असे समितीने विचारले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, वाळवा तालुक्याच्या गट विकास अधिकाऱ्यांनी याबाबत पुढाकार घेतल्यामुळे त्या ठिकाणी ही पद्धत अगोदर सुरू करण्यात आली.

विभागीय सचिव यांनी सांगितले की, वाळवा तालुक्याचे गट विकास अधिकारी श्री. बडे यांनी स्वतः इतर राज्यांच्या पद्धती समजून ई-मस्टरींगचे काम सुरू केले. आता इतर सर्व ठिकाणी ई-मस्टर पद्धत सुरू करावयाची आहे. या संदर्भात उपायुक्त, रोजगार हमी योजना यांनी सांगितले की, पुणे विभागात हजेरीपटांचे वेतन विलंबाने होत होते. एप्रिल महिन्यापासून सर्व वेतन प्रलंबित होते. गेल्या दोन महिन्यापासून विभागामध्ये हजेरीपटांसह आढावा घेत आहोत. कोणत्याही ठिकाणी ऑक्टोबर पूर्वी वेतन प्रलंबित नाही. काही ठिकाणी नोव्हेंबर पर्यंतचे वेतन होणे बाकी आहे. जे वेतन प्रलंबित आहे, ते वैयक्तिक लाभांच्या योजनांचे आहे. कारण वैयक्तिक लाभाच्या योजनांचे मोजमाप करण्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग नाही.

यंत्रणा हजेरीपट वेळेवर पाठवित नाहीत अशी कोणी तक्रार केली आहे काय? असे समितीने विचारले असता उप जिल्हाधिकारी (रोहयो) (अतिरिक्त कार्यभार) यांनी सांगितले की, आटपाडी तालुक्यातील शाखा अभियंत्यांकडून वेळेवर हजेरीपट पाठविले जात नव्हते म्हणून त्याच्यावर विभागीय चौकशी आणि निलंबनाचा प्रस्ताव तयार केला आहे. तो उपायुक्त, रोजगार हमी योजना, पुणे यांच्याकडे त्वरीत पाठविण्यात यावा अशी सूचना समितीने जिल्हाधिकारी यांना केली त्यांनी हा प्रस्ताव लवकरात लवकर विभागीय कार्यालयाकडे पाठवावा. कारण एखाद्यावर कारवाई केल्याशिवाय यामध्ये सुधारणा होणे शक्य नाही. अशा प्रकारची कारवाई केली तरच काही सुधारणा होतील.

उप जिल्हाधिकारी (रोहयो) यांनी सांगितले की, दिनांक २८ जानेवारीला हा प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयात पाठविण्यात येईल. जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, हजेरीपटाच्या बाबतीत हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस दिली आहे. त्यांचा खुलासा प्राप्त झाल्यावर निश्चित कारवाई करण्यात येईल. तसेच जिल्हा परिषदेच्या महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या गट विकास अधिकारी श्रीमती इंदुलकर योजनेच्या कामाकडे दुर्लक्ष करीत असल्यामुळे त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले आहे.

मजूरांना मजूरी वेळेवर मिळाली पाहिजे याची जाणीव संबंधिताना असावी म्हणून या सर्व प्रकारांना आळा घालण्यासाठी संबंधितावर कारवाई केली तरच बाहेर चांगली बातमी जाईल व असा विलंब होणार नाही असे समितीचे मत आहे. यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, आता

ई-मस्टर पद्धत सुरू केल्यामुळे मजूरी वाटपास विलंब होणार नाही. सांगली जिल्ह्यात १८७ ग्रामपंचायती असून, रोजगार हमी योजनेची ३६० कामे सुरू आहेत. ३६० कामांवर ४१५३ मजूर काम करीत आहेत. कवठेमहांकाळ येथे १२ कामे सुरू असून १४७ मजूर काम करीत आहेत शिवाय यंत्रणेची ४ कामे सुरू असून १३ मजूर कामावर आहेत. जत तालुक्यातील ४५ कामांवर ६७ मजूर काम करीत आहेत.आटपाडी तालुक्यातील २७ कामांवर २१७ मजूर काम करीत आहेत पुढील महिन्यापासून जिल्ह्यामध्ये रोजगार हमी योजनेच्या मजूरांमध्ये वाढ होईल.

समितीने सामाजिक वनीकरण यंत्रणेबाबत विचारणा केली की, या यंत्रणेत रोजगार हमी योजनेंतर्गत रोप वाटीकेची कामे सुरू आहेत. की, तेथे रोप वाटीकेच्या कामावर तेच तेच मजूर घेतले जातात. कालांतराने त्यांच्याकडून सेवेत सामावून घेण्याबाबत मागणी होते. त्यामुळे शासनासमोर पुन्हा एक प्रश्न उभा राहतो.ही बाब समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून दिली या संदर्भात उप संचालक सामाजिक वनीकरण, यांनी अशी माहिती दिली की, रोप वाटीकेच्या कामावरील मजूरांना १०० दिवसानंतर इतरत्र फिरवावयास सांगण्यात आलेले आहे. नरेगा अंतर्गत ३० नवीन योजना सुरू केल्या आहेत. नरेगातून शेततळी घेणे, गाळ काढून तो ३ कि.मी. अंतरापर्यंत शेतात वाहून आणण्यासाठी ट्रॅक्टर वापरणे, आदिवासींच्या बाबतीत पडकाई जमिनींबाबतची कामे, विहिरीच्या किंमतीची मर्यादा २ लाखांवरुन ३ लाख रुपये करणे, प्रत्येक ग्रामपंचायतींमध्ये तरुणांसाठी मैदान करणे, स्वच्छतागृहे करणे इ. अनेक योजना अंतर्भूत केलेल्या आहेत. नरेगा योजनांच्या कामांची यादी वाढतच आहे. परंतु ती कामेपूर्ण करण्यासाठी खालच्या स्तरावरील लोकांकडून अपेक्षित सहभाग मिळत नाही.

या उत्कृष्ट योजना तयार करून अंमलबजावणीसाठी खाली पाठविण्यात येतात परंतु त्याचा अपेक्षित निर्णय मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. योजनांची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने सचिव स्तरावर योग्य त्या सूचना जाणे आवश्यक आहे असे समितीने मत मांडले. यावर विभागीय, सचिव यांनी सागितले की, राज्यात कामाचा ताण असलेल्या १५० तालुक्यांमध्ये पूर्ण वेळ प्रत्येकी २ ग्रामविकास अधिकारी आणि नायब तहसीलदारांची नियुक्ती केली आहे. त्यांचा आर्थिक भार विभागाच्या निधीतून उचलणार आहोत. वित्त विभागावर याचा आर्थिक बोजा पडणार नाही.

भालवली गावात दोन योजनांमुळे ८५ टक्के क्षेत्र ओलिताखाली आहे. तरी सुद्धा या गावात वैयक्तिक लाभाच्या योजनेंतर्गत विहिरींना मंजुरी दिली आहे.. आढावा घेतला असता, त्या गावात १५ विहिरींना मान्यता दिली आहे. या गावात ४ फुटावर पाणी लागते. खरे म्हणजे शासन निर्णयानुसार प्रस्तावित विहिरीचे अंतर अस्तित्वातील विहिरीपासून ५०० फुटापेक्षा जास्त असावयास पाहिजे. परंतु शेतीवरील बांधाच्या एका बाजूला एक आणि दुसऱ्या बाजूला दुसरी विहीर आहे. याकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. या बाबतची चौकशी करून त्याबाबतचा अहवाल समितीला द्यावा. तसेच शेत तळयांबाबत सांगावयाचे झाले तर, खानापूर मतदारसंघामध्ये काही शेतकऱ्यांच्या शेताच्या एका बाजूला एक शेत तळे आहे, तर दुसऱ्या बाजूला दुसरे शेत तळे आहे. एका शेत तळयाचा निधी तर तीन यंत्रणांकडून घेतला गेला ही गंभीर बाब आहे. योजना राबविणारी यंत्रणा, लाभार्थी यांच्याबाबत हे सर्व पाहिल्यानंतर फार मन:स्ताप होतो. लोकप्रतिनिधींनी तक्रार केल्यानंतरही काहीही कारवाई होत नाही हे फार मोठे दुर्दैव आहे. या खर्चामध्ये वाढ झालेली आहे तरी, प्रत्यक्षात फिल्डवर काय चालते हे देखील पाहणे गरजेचे आहे असे समितीने आपले मत मांडले.

समितीने पुढे असेही स्पष्ट केले की, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांकडून चांगल्या सूचना जात असतील परंतु, खालच्या स्तरावरील यंत्रणेवर नियंत्रण कमी पडत आहे.या संदर्भात विभागीय सचिव यांनी माहिती दिली की, कामाच्या क्वालिटी कंट्रोलबाबत सांगावयाचे झाले तर क्वालिटी कंट्रोल चेकिंग बाबत मध्य प्रदेशने एक नवीन योजना प्रस्तावित केली आहे. अशा प्रकारच्या नवीन योजनांची माहिती घेऊन याबाबत पाठपुरावा केला जात आहे सचिवांनी सांगली जिल्ह्याला भेट दिली होती, त्यावेळेस त्यांनी सूचना दिली होती की, जिल्ह्यामध्ये अतिदुष्काळी, मध्यम दुष्काळी व सर्वसाधारण दुष्काळी तालुके निश्चित करून त्या प्रमाणे कामाचे नियोजन करावे. त्यानुसार जत, आटपाडी सारख्या अतिदुष्काळी तालुक्यात प्रती दिन २०० ते ५०० मजूरांना काम देता येईल अशा प्रकारचे नियोजन करून त्याचे मॉनिटरिंग करावे. मध्यम दुष्काळी तालुक्यांमध्ये प्रत्येक आठवड्याच्या कामाचे नियोजन करून मॉनिटरिंग करावे व सर्वसाधारण दुष्काळ असणाऱ्या तालुक्यामध्ये महिन्याभराच्या कामाचे नियोजन करून मॉनिटरिंग करावे असे ठरले होते. त्याप्रमाणे दुष्काळी तालुक्यांचे ए, बी व सी या प्रमाणे नियोजन करण्यात आलेले असून, फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जवळपास ८७ कामे सुरू होतील.

कवठेमहांकाळ येथे कमी काम झाले आहे याची कारणे काय आहेत तसेच तेथील कामे लवकरात लवकर करण्याबाबत कार्यवाही करावी असे समितीने स्पष्ट केले असता, जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी यांनी सांगितले की, या ठिकाणी ८ ते ९ क्षेत्रामध्ये कमी प्रमाणात अधिकारी व कर्मचारी आहेत. कार्यालयामध्ये तर कर्मचारी नसल्याने त्यांच्या कार्यालयातील काही कर्मचारी तेथे काम करण्यासाठी पाठविले आहेत.

**अभिप्राय व शिफारशी :**

**सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ, जत आणि आठपाडी येथे तीव्र दुष्काळी असताना तेथील मजूरांना तातडीने मजूरी देणे गरजेचे असताना मजूरी वेळेवर न देता जिल्ह्यात इतरत्र वेळेवर मजूरी देण्यात आली असे समितीच्या निदर्शनास आले आहे. या संदर्भात समिती नाराजी व्यक्त करीत आहे. समिती अशी शिफारस करीत आहे की, वाळवा तालुक्यातील गटविकास अधिकाऱ्यांनी**

**सुरू केलेली ई-मस्टरची पद्धत पुर्ण राज्यभर कार्यान्वीत करण्यात यावी तसेच या अधिकाऱ्यांनी कामात दाखविलेल्या आस्थेबाबत प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने शासनाने योग्य ती नोंद घ्यावी व ही पद्धत त्वरित सुरू करून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करावी.**

**५. अपूर्ण कामे :**

दिनांक २१ व २२ सप्टेंबर २०११ रोजी सांगली येथे झालेल्या जिल्हा बैठकीच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतील "अपुर्ण कामे" यासंदर्भात समितीने विचारणा केली की, सुधारित अंदाजपत्रकाअभावी ६ ते १० वर्षे या कालावधीतील १८ कामे अपूर्ण असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. उप विभागीय वन अधिकारी, सांगली या यंत्रणेची ४ कामे, कार्यकारी अभियंता (छो.पा.वि.)जि.प.सांगली या यंत्रणेची २ कामे आणि कार्यकारी अभियंता ल. पा., स्था.स्तर वि. सांगली या यंत्रणेची १२ कामे अशी एकूण १८ कामे सुधारित अंदाजपत्रकाअभावी अपूर्ण आहेत. ही कामे पूर्ण करण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आलेले आहेत? जिल्हाधिकारी, सांगली यांनी सांगितले की, सांगली जिल्ह्यात एकूण ११३ अपूर्ण कामे आहेत. त्यापैकी भूसंपादनाअभवी ३ कामे, सुधारीत अंदाजपत्रकाअभावी १८ कामे, मजूरा अभावी ५ कामे, कुशल निधी अभावी ३५ कामे व इतर कारणामुळे २० कामे आणि प्रगती पथावरील ३२ कामे अशी एकूण ११३ कामे अपूर्ण आहेत. अशी माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली. यावर समितीने अशी विचारणा केली की, कार्यकारी अभियंता,ल.पा., स्था.स्तर, सांगली या यंत्रणेची मजूरांअभावी १ ते ५ वर्ष कालावधीतील २ कामे अपुर्ण असल्याची नमूद करण्यात आले आहे. ही कामे पुर्ण करण्यासाठी सन २००५ पासुन मजूर मिळाले नाहीत का? सांगली जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजूराची उपस्थिती १४ हजार इतकी होती असे दिसते, यावर कार्यकारी अभियंता, ल.पा.स्था.स्तर यांनी सांगितले की, ही कामे सन २००५ मध्ये सुरू करण्यात आली होती परंतु त्या भागामध्ये मजूर उपलब्ध न झाल्यामुळे कामे पुर्ण होवू शकली नाहीत तसेच ही कामे एमआरइजीएस मध्ये घेण्याचे प्रस्तावित केले आहे.

रोजगार हमी योजनेची अपूर्ण कामे जून २०१२ पर्यंत पूर्ण करावयाची आहेत. आता ही कामे एमआरईजीएसमध्ये रूपांतरीत करीत आहात. रोजगार हमी योजनेची अपूर्ण कामे सन २०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे शासनाला आश्वासन दिलेले आहे. अधिकाऱ्याची काम करण्याची इच्छा शक्ति असेल तर कामे होऊ शकतात परंतु अधिकाऱ्याची काम करण्याची इच्छा शक्ती दिसत नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे.

मजूराअभावी कामे बंद आहेत. हे कारण संयुक्तिक वाटत नाही. सांगली जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यामध्ये रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजूरांची उपस्थिती १४ हजार असल्याचे शासनाला ऑनलाईन कळविलेले आहे. याचा अर्थ शासनाला खोटी माहिती देत आहात काय? मजूर उपस्थितीचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे आल्यानंतर ते मंत्रालयामध्ये अहवाल पाठवितात. तो अहवाल मंत्रालयातील उप सचिवांच्या स्वाक्षरीने केंद्र शासनाकडे पाठविला जातो अशा प्रकारच्या कार्यवाहीची पद्धती असल्याचे समितीने विषद केले.

सांगली जिल्ह्यातील बीपीएल कॉर्ड धारकांची संख्या किती आहे असे समितीने विचारले असता, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, जिल्ह्यात ५१७८६ बीपीएल कार्डधारक कुटुंबे आहेत. त्यापैकी १-२ टक्के लोक रोजगार हमी योजनेच्या कामावर उपस्थित राहू शकतात. राज्यातील इतर जिल्ह्यात अशी परिस्थिती नाही. समितीने मध्यंतरी वर्धा जिल्ह्याचा दौरा केला होता तेथे सुद्धा समितीला रोजगार हमी योजनेच्या कामावर मजूर उपस्थित होते. कार्यकारी अभियता, ल.पा.स्था.स्तर या यंत्रणेकडील पाझर तलाव भोसे क्रमांक ५ हे काम भौतिकदृष्ट्या पुर्ण झाले असून कुशल देयक बाकी असल्याचे नमूद केले असल्याने या संदर्भात समितीला माहिती द्यावी. त्याबाबत कार्यकारी अभियता, ल.पा., स्था.स्तर यांनी सांगितले की, भोसे पाझर तलावाचे काम पुर्ण झाले आहे.

कार्यकारी अभियंता, ल. पा. स्था.स्तर वि. सांगली या यंत्रणेची एकूण १२ कामे अपूर्ण असून ही कामे पूर्ण करण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत असे समितीने विचारणा केली असता त्यांनी माहिती दिली की, १२ कामांपैकी ४ कामे पूर्ण झाली आहेत आणि ३ कामे प्रगतीपथावर आहेत. निगडी येथील पाझर तलावाच्या घळ भरणीचे काम सुरू आहे. सा.बा. (पश्चिम) विभाग, सांगली या यंत्रणेची ३ कामे अपूर्ण असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या कामाची सद्यःस्थिती काय आहे? असे समितीने विचारले असता कार्यकारी अभियंता, सा.बा. (प) विभाग, सांगली यांनी सांगितले की, एकूण ८ कामे अपूर्ण असून त्यापैकी ४ कामे कुशल कामाच्या निधी अभावी अपूर्ण आहेत. शासनाकडे २२ कामांचा अहवाल सादर करण्यात आला होता. २२ कामांपैकी १८ कामांसाठी निधी उपलब्ध झालेला असून ४ कामांसाठी अद्यपि निधी उपलब्ध झालेला नाही.

प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांनी रोजगार हमी योजनेची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी मंत्रालय स्तरावर, आयुक्त स्तरावर, जिल्हाधिकारी स्तरावर वारंवार बैठका घेतल्या आहेत. रोजगार हमी योजनेची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासंदर्भात शासनाने वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित केलेले आहेत. रोजगार हमी योजनेची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासंदर्भात प्रधान सचिवांनी संबंधित अधिकाऱ्यांना आदेश दिलेले आहेत. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांना ताकीद सुद्धा दिलेली आहे. सांगली जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात १४ हजार मजूर रोजगार हमी योजनेच्या कामावर उपस्थित होते. मजूरांना काम उपलब्ध करून देण्यात येत आहे. असे अभिलेख्यावरुन दिसत आहे. मजूर उपलब्ध असताना सुद्धा मजूर उपलब्ध

नाहीत असे सांगून कामे अपुर्ण ठेवणे उचित नाही. सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे, भुसंपादन करणे, शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देणे या प्रशासकीय बाबीकडे मागील ७-८ वर्षापासुन संबंधित अधिकाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. ही कामे केली नाहीत तरी चालेल असा समज करून घेणे योग्य नाही यानंतर संबंधित विभागाचे सचिव तसेच वेगवेगळया अधिकाऱ्यांची साक्ष समिती घेते. साक्ष घेतल्यावर सदर अहवाल तयार करण्यात येतो तो अहवाल विधानसभेत/विधानपरिषदेत सादर झाल्यानंतर त्या अहवालाचा अनुपालन अहवाल समिती बनवते. बैठक संपली की सर्व संपले असे कोणत्याही अधिकाऱ्यांनी समजू नये. अपूर्ण कामे पूर्ण करण्याच्या संदर्भात कार्यवाही करण्यात यावी. कारण याबाबत २-३ महिन्यात सचिवांची साक्ष घेण्यात येईल. त्यावेळी जिल्ह्यातील सद्यःपरिस्थितीची माहिती मागविण्यात येईल. त्यावेळी आताच्या अपुर्ण कामाची प्रगती समितीला आढळून आली पाहिजे. सांगली जिल्ह्यातील जत, कवठेमहांकाळ, आटपाडी या तालुक्यात दुष्काळ असल्यामुळे या भागात ८ ते १४ हजार मजूर रोजगार हमी योजनेच्या कामावर उपस्थित असल्याचे दर्शविण्यात आले आहे. त्यामुळे जी अपूर्ण कामे आहेत ती पूर्ण करण्यात यावीत. मजूर नाहीत ही सबब चालणार नाही. ही बाब सर्व यंत्रणांनी लक्षात घ्यावी. कामात दिरंगाई केली तर सचिवांच्या साक्षीमध्ये या बाबी निदर्शनास येतील. त्यानंतर मग दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची शिफारस करण्यात येईल. सहा महिन्यात जर कामाची प्रगती आढळून आली नाही तर संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चित कारवाई करण्यात येईल. याबाबत अधिकाऱ्यांनी आवश्यक ती काळजी घ्यावी असे समितीने स्पष्ट केले.

यासंदर्भात उपायुक्त यांनी असे सांगितले की, या जिल्ह्यात कुशल कामाचा निधी प्रलंबित आहे. कुशल कामाची प्रकरणे निधी अभावी थांबविण्यात आली आहे. त्यावर विभागीय अधिकारी यांनी सांगितले की, शासनाकडून कुशल निधीचे वाटप करण्यात आले आहे. समितीने विचारणा केली की, निमज ते बिरोबा देऊळ रस्ता कुशल कामाच्या अनुदानाअभावी प्रलंबित आहे काय? उपायुक्त यांनी सांगितले की, जिल्ह्यातील एकूण २२ कामापैकी ४ कामांचा कुशल निधी प्रलंबित आहे. ही ४ प्रकरणे दिनांक २० ऑगस्ट, २०११ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आली आहेत असे विभागीय अधिकारी यांनी सांगितले. ही प्रकरणे अद्याप जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाली की, नाही. ते तपासून घेतो असे जिल्हधिकारी यांनी सांगितले असता, या प्रकरणाची तपासणी करून बैठक संपण्यापूर्वी माहिती द्यावी असे समितीने स्पष्ट केले. त्यावर उपायुक्त यांनी सांगितले की, ४ कामांची मंजुरी दि. २० ऑगस्ट, २०११ रोजी आलेली आहे. ही माहिती आयुक्त कार्यालयाने जिल्हाधिकारी कार्यालयास का कळविली नाही. एक महिना झाला तरी माहिती कळविली नाही हे योग्य नाही तसेच या प्रकरणात एक महिन्याचा विलंब झाला आहे. प्रलंबित प्रकरणातील आलेला निधी आयुक्त कार्यालयाने तात्काळ विभागाला दिला पाहिजे. जिल्हाधिकारी कार्यालयास माहिती मिळत नाही हे बरोबर नाही असे समितीने मत व्यक्त केले.

अपुर्ण कामे पूर्ण करण्यातबाबत आयुक्त कार्यालयाने जिल्हधिकारी कार्यालयात माहिती देणे अपेक्षित आहे. आयुक्त कार्यालय काय काम करते. अपुर्ण कामे पुर्ण करण्यासंदर्भात मंत्रालय स्तरावर आढावा घेतला जात आहे. परंतु आयुक्त स्तरावर आढावा घेतला जात नाही. विभागीय आयुक्त यांनी दर ३ महिन्यातून एकदा अपूर्ण कामांच्या संदर्भात आढावा बैठक घेतली पाहिजे. आयुक्त यांनी बैठक घेतली नाही असे दिसुन येते. असे समितीने मत व्यक्त केले असता, विभागीय अधिकारी यांनी सर्व आयुक्त कार्यालयांना मंत्रालयातून व्हीडीओ कॉन्फरिंगद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत. अशी समितीला माहिती देण्यात आली.

समितीच्या दिनांक २१ व २२ सप्टेंबर, २०१२ रोजी झालेल्या जिल्हा बैठकीच्या अनुषंगाने समितीने दिनांक २३ जानेवारी, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. जिल्हा बैठकीत दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने पुरविण्यात आलेल्या माहितीच्या संदर्भात समितीने विचारणा केली की, १३ अपूर्ण कामांपैकी ५ कामे मजुरांअभावी सन २००५ पासून बंद आहेत, त्याबाबत माहिती देण्यात यावी. जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सदरहू पाच कामांपैकी पाझर तलाव, हिवथड नं. ३ हे काम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्याचे प्रस्तावित केले आहे. पाझर तलाव पुजारवाडी (चिखो) तसेच, पाझर तलाव, मोघमवाडी या कामांवरील खर्च १० टक्क्यांपेक्षा कमी असल्याने ती कामे रोजगार हमी योजनेतून वगळण्यात आली आहेत. तसेच पाझर तलाव, विभूतवाडी हे काम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्याचे प्रस्तावित आहे.

समितीने विचारणा केली की, पाझर तलाव, हिवथड नं. ३ व पाझर तलाव, विभूतवाडी ही कामे रोजगार हमी योजनेंतर्गत अंतर्भूत असताना, त्यांचा समावेश महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत करण्याचे का प्रस्तावित केले? या कामावर किती निधी खर्च झाला आहे? तेथे जमिनीबाबत किंवा इतर काही अडचणी आहेत का, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून हे काम होऊ शकेल का? याबाबत विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले की, सदरहू योजना रोजगार हमी योजनेतून वगळून त्यांचा समावेश महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये करण्यात आला आहे. मजूर उपलब्ध नसल्याने हे काम होऊ शकले नाही. या योजनेवर जवळपास ४ लाख ७५ हजार रुपये इतका निधी खर्च झाला असून हा खर्च १० टक्क्यांपेक्षा कमी आहे. तेथे जमिनीबाबत काही अडचणी नाही. मजूर उपलब्ध झाल्यानंतर हे काम पूर्ण होईल.

केवळ वेळ मारून नेण्याकरिता काहीही उत्तर देण्यापेक्षा हे काम करण्याकरिता मजूर उपलब्ध होणार असतील तर त्याबाबत सांगावे. तीन वर्षांपासून दुष्काळ असतानाही काम झालेले नाही. असे समितीने स्पष्ट केले असता का.अ.ल.पा.(स्था.स्तर) यांनी सांगितले की, मजूरांअभावी काम बंद आहे.

समितीने पुढे असे स्पष्ट केले की, समितीच्या साक्षी दरम्यान समितीच्या लक्षात आलेली सर्वात वाईट गोष्ट कोणती असेल तर, ती म्हणजे वेळ मारून नेण्यासाठी अशा प्रकारची उत्तरे दिली जातात. वस्तुस्थिती का सांगितली जात नाही? हे काम सन २००५ पासून बंद आहे त्याबाबत कोणावर कारवाई केली का, त्याची वस्तुस्थिती काय आहे हे पाहण्याचा प्रयत्नच झालेला दिसत नाही. सदरहू योजना कोणत्या सर्व्हे नंबरमध्ये आहे, कोणत्या क्षेत्रात आहे हे न पाहता सांगावे. माहिती नसताना उगीचच काही तरी उत्तर सांगून वेळ मारून नेण्याची अधिकाऱ्यांची जी प्रवृत्ती आहे ती बरोबर नाही. या विषयाकडे आपण गांभीर्याने पाहिले पाहिजे. सदरहू योजना प्रस्तावित केली असेल, तर त्याचे काम कोणत्या स्तरावर आहे याची समितीला माहिती दयावी.

पाझर तलाव, पुजारवाडी (चिखो) हे काम दिनांक २६-६-२०१२ अन्वये वगळण्यात आले आहे असे नमूद केले आहे. सन २००५ सालचे काम सन २०१२ मध्ये वगळण्याबाबतचा निर्णय होत असून विलंबाने निर्णय घेण्याची प्रक्रिया योग्य नसल्याचे समितीने स्पष्ट केले असता उपायुक्त, रोहयो यांनी सांगितले की, सदरहू कामावरील खर्च हा १० टक्क्यांच्या आत आहे. मात्र या पुढील कामांमध्ये चांगली प्रगती केल्याचे दिसून येईल. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या कामांच्या बाबतीत केवळ ५ ते १० लाख रुपये खर्च केला तर ती पूर्ण होऊ शकतात अशा कामांच्या बाबतीत सुधारित प्रशासकीय प्रस्ताव करण्याऐवजी तेवढाच निधी मिळवून ती कामे पूर्ण करण्याबाबत आता विशेष बाब म्हणून पाठपुरावा करण्याचे ठरविले आहे.

पूर्वीची जी कामे आहेत, त्यावर किती रुपयांचा खर्च झाला त्याकडे कोणीही पाहतच नाही. ही योजना पाहिली तर सन २००५ मध्ये ही योजना सुरू होऊन ७ वर्षे काम झाले नाही. तो निधी इतर कामांसाठी वापरता आला असता. व्यवस्थित नियोजन केले गेले नाही, याला जबाबदार कोण आहे, याची जबाबदारी कोणावरही निश्चित करू शकत नाही का? आटपाडी तालुक्यामध्ये ८७ कामे सुरू होणार आहेत. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शासन तेथे अनेक गोष्टी करू शकले असते. परंतु, तसे झालेले नाही. अशा काही गोष्टी आहेत की, ज्या सदस्य पोटतिडकीने मांडतात. याबाबतचे नियोजन करताना आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. समिती याबाबत केवळ सूचना करू शकते असे समितीने स्पष्ट केले असता का.अ.ल.पा.स्था.स्तर यांनी सांगितले की, हिवथड नं. ३ येथील कामावर ४ लाख ७५ हजार इतका खर्च झाला आहे. विभूतवाडी येथील कामावर ४ लाख १७ हजार रुपये इतका खर्च झाला आहे.

समिती समोर अशा प्रकारची दिशाभूल करणारी उत्तरे देण्यापेक्षा जी काही वस्तुस्थिती आहे ती, सांगितली तर उचित होईल. समितीच्या मते एखाद्या कामातून काही आऊटपूट निघत असेल तर ते करावे, अन्यथा ते काम करण्यात, उगीचच कागदपत्रे नाचविण्यात अर्थ नाही. असे समितीने मत व्यक्त करून पुढे विचारणा केली की, ही दोन कामे कशा प्रकारे पूर्ण केली जाणार आहेत, तसेच आटपाडी तालुक्यातील परिस्थिती पाहिली तर, तेथे काम करण्याकरिता मजूर उपलब्ध होतील का, ते पाझर तलावांच्या कामाकरिता येतील का ?

यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, आटपाडी तालुक्यामध्ये मजूर मिळतील परंतु, विशिष्ट अशा तालुक्याबाबत सांगणे कठीण आहे. तसेच का.अ.ल.पा.स्था.स्तर यांनी सांगितले की, सदरहू कामांमध्ये १० टक्क्यांपेक्षा कमी खर्च झाला आहे. सदरहू काम सुधारीत अंदाजपत्रक तयार करून होऊ शकतात. समितीने विचारणा केली की, त्यामध्ये अनेक कामांचा समावेश होतो, त्यांचे प्रमाण पाहिले आहे का? हे काम कशा प्रकारे केले जाणार आहे, त्याबाबत माहिती देण्यात यावी. स्थानिक स्तरावरील काम करताना डीपीडीसीने फंड दिला तरच कामे होतील अन्यथा त्यांच्याकडे स्वतःचा असा निधी नसतो. यावर का.अ.ल.पा. स्था.स्तर यांनी सांगितले की, पहिल्या चार योजनांपैकी दोन योजना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. तर दोन योजना डीपीडीसीमधून प्रस्तावित करण्यात येतील.

समितीने पुढे स्पष्ट केले की, आपण तसे खरोखर प्रस्तावित करणार आहात का? असे मोघम उत्तर देण्यापेक्षा समितीच्या बैठकीस उपस्थित असलेल्या सन्माननीय सदस्य, सचिव, जिल्हाधिकारी व इतर अधिकाऱ्यांसमोर आपण ही कामे ज्या योजनेतून प्रस्तावित करणार आहात त्या बाबत सांगावे. तसे सांगू शकत नसाल तर, आपण खोटे उत्तर का दिले हे सांगावे. याबाबत संबंधितांकडून उत्तर आलेले नाही. त्यामुळे समितीने विभागीय सचिवांना निदेश दिले की, या साऱ्या उत्तरांवरुन आपल्याला या बाबतची वस्तुस्थिती लक्षात आलीच असेल. त्यामुळे आपण या बाबतीत आपल्या पद्धतीने दखल घेऊन जे उचित असेल ते करावे. केवळ ताकिद देऊन यामध्ये सुधारणा होणार नाही तर यापूर्वी प्रस्तावित केल्याप्रमाणे इतर लोकांपर्यंतही संदेश जाईल अशी काही कारवाई करता येत असल्यास करावी. तसेच, केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला अवगत करावे.

समितीने विचारणा केली की, पिण्याच्या पाण्याची विहीर, बिळूर, ता. जत या कामाच्या सद्यःस्थिती बाबत माहिती देण्यात यावी. जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सदरचे काम, सन २००४-२००५ मध्ये मंजूर झाले आहे. त्याची अंदाजपत्रकीय किंमत १.२७ लक्ष इतकी होती. त्यापैकी अकुशल कामावर रक्कम रुपये ८६७८७ इतका खर्च झाली आहे. सदर विहिरीचे काम मजूराअभावी बंद पडले आहे. सद्यःस्थितीत विहीर गाळाने भरली आहे असे सहायक भूवैज्ञानिक, ग्रा.पा.पु. विभाग यांनी कळविले आहे. त्यामुळे सदरहू कामास स्थगिती देण्याबाबत त्यांनी सूचना दिल्या आहेत. सदर काम आहे त्या स्थितीत बंद करण्यात आले आहे. हे काम रोजगार हमी योजनेमधून वगळणे प्रस्तावित आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, सन २००४-२००५ मध्ये या कामास मंजुरी देण्यात आली आहे. कोणत्याही ठिकाणी विहीर बांधताना जीएसडीए यांचे सर्टिफिकेट घ्यावे लागते. त्या शिवाय विहीरीच्या कामास परवानगी देण्यात येत नाही. त्यामुळे या विहीरीचे काम करतानाही निश्चितपणे सर्टिफिकेट घेतले असेल. मग आता त्या विहीरीस पाणी लागले नाही असे कसे सांगत आहेत ?

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, निश्चितपणे विहिरींना मंजुरी देताना जीएसडीए यांचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. परंतु, सदरहू ठिकाणी विहीर बांधल्यानंतर जेव्हा ते काम viable नाही हे कळल्यानंतर, त्याबाबत विचारणा केल्यानंतर आता याबाबत काहीही होण्यासारखे नाही असे कळले.

सदरहू विषय गांभीर्याने घेतला पाहिजे. सन २००४-२००५ मध्ये विहीर मंजूर झाली आहे. गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी विहीर घेण्यात आली होती. जीएसडीएचे प्रमाणपत्र असल्याशिवाय विहीर मंजूर करण्यात येत नाही. विहिरीच्या कामाला सुरूवात होऊन त्यावर ८६ हजार रुपये खर्च झाला आहे. हा खर्च अकुशल कामाचा आहे. ही विहीर गाळाने भरलेली आहे व त्या ठिकाणी पुरेसे पाणी नाही असे सहाय्यक भूवैज्ञानिक यांनी कळविल्यानंतर ते काम बंद करण्यात आले. आता हे काम रोहयोमधून वगळणेबाबत प्रस्तावित करण्यात आले आहे. याबाबत काय म्हणणे आहे? अशी समितीने विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सन २००४-२००५ मध्ये हे काम मंजूर झाले. त्या वर्षी चांगला पाऊस झाला होता. त्यानंतर सतत तीन वर्षे दुष्काळ पडल्यामुळे पाण्याची पातळी खाली गेली. साक्षीच्या अनुषंगाने आढावा घेतला होता त्यावेळी देखील अधिकाऱ्यांनी सांगितले की, सततच्या तीन वर्षात दुष्काळ पडल्यामुळे पाण्याची पातळी खाली गेली आणि आज अखेरपर्यंत पाणी लागण्याची शक्यता फार कमी आहे. सन २००४-२००५ मध्ये विहीर मंजूर झाली असेल तर ती त्याच वर्षात पूर्ण व्हावयास पाहिजे होती. असे समितीने विचारले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की, मजूरा अभावी काम बंद झाले होते. नंतरच्या काळात विहिरीमध्ये बाजूची माती पडली.

सन २००४-२००५ मध्ये विहीर मंजूर झाली. विहिरीची किंमत १ लाख २७ हजार इतकी होती. त्यापैकी ८६ हजार रुपये खर्च झाले. फक्त कुशल काम बाकी आहे. कुशल काम तातडीने करून घेतले असते तर ही विहीर गाळाने भरली नसती आणि पुन्हा जीएसडीएकडून प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता पडली नसती असे समितीने स्पष्ट केले असता, उपायुक्त, रोहयो यांनी सांगितले की, या कामासाठी का उशीर झाला याची विभागीय आयुक्त कार्यालयाकडून चौकशी करण्यात येईल.

का.अ.ल.पा.(स्था.स्तर) विभाग, सांगली या यंत्रणेची अपूर्ण कामे पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, कामांची सद्य:स्थिती काय आहे? असे समितीने विचारले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, एकूण ८० कामे अपूर्ण होती त्यापैकी ७५ टक्के कामे पूर्ण झालेली आहेत. यातील तीन कामे वगळण्यात आलेली आहेत. १७ कामे इतर योजनांमधून घेण्यासाठी ती कामे रोहयोमधून वगळण्याचे प्रस्तावित केले होते. १७ पैकी ९ कामांवरील खर्च १० ते ९० टक्केच्या आसपास असल्याने ती कामे वगळण्यासाठी आयुक्त स्तरावर प्रस्ताव सादर केला आहे. उर्वरित आठ कामे शकपूर्ततेसाठी आली होती त्याची पूर्तता करून पाठविली आहे. समितीने विचारणा केली की, ५५ कामे भौतिकदृष्टया पूर्ण झालेली आहेत असे पुस्तिकेमध्ये नमूद केलेले आहे. भौतिकदृष्टया पूर्ण म्हणजे काय? यावर कार्यकारी अभियंता,ल.पा.यांनी सांगितले की, काम पूर्ण झालेले आहे. फक्त निधी मिळण्याचे बाकी आहे. जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, साईटवर काम पूर्ण झालेले आहे. कामाची सी.सी. राहिली आहे, पेमेंट राहिले आहे अशी कामे भौतिकदृष्टया पूर्ण समजली जातात. समितीने विचारणा केली की, दोन अपूर्ण कामांची काय सद्य:स्थिती आहे? पाझर तलाव झाल्यास आजूबाजूच्या परिसरातील विहिरींना पाणी लागते. जर पाझर तलावाचे काम अपूर्ण राहिल्यास शेतकऱ्यांना त्याचा काही उपयोग होणार नाही. पाझर तलाव, धोंडेवाडी, ता.खानापूर या कामाची सद्य:स्थिती काय आहे? यावर विभागीय अधिकारी यांनी सांगितले की, करगणी पाझर तलावाचे काम भौतिकदृष्टया पूर्ण झाले आहे. पाऊस न झाल्यामुळे पाझर तलावात पाणी साठा झाला नाही. आज अखेरपर्यंत १७ टक्के पाणी साठा आहे. आपल्याकडे ८३ मध्यम लघु प्रकल्प आहेत. पाझर तलाव, धोंडेवाडी, या कामास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला आहे.

कार्यकारी अभियंता सा.बा. विभाग, सांगली या यंत्रणेची २२ कामांपैकी निधी उपलब्ध झालेल्या १८ कामांची सद्य:स्थिती काय आहे? अशी समितीने विचारणा केली असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, १८ कामे पूर्ण झाली आहेत. ४ कामे निधी अभावी प्रलंबित आहेत. खुजगाव ते वाघजई रस्ता, हातनूर ते धोंडीवाडी रस्ता, धोंडीवाडी ते मोरदरा रस्ता, करंजेते भास्करनाना रस्ता अशी चार कामे निधी अभावी प्रलंबित आहेत. या ४ कामांसाठी शासनाकडे दिनांक ११ जानेवारी २०१३ रोजी मागणी केली आहे. यावर विभागीय अधिकारी यांनी सांगितले की, त्यांच्याकडून मागणी आली आहे. त्यांची मागणी पुरवणी मागण्यांमध्ये मंजूर करण्यात येईल.

**अभिप्राय व शिफारशी :**

**(१) सांगली जिल्ह्यातील एकूण ११३ कामे विविध कारणास्तव अपुर्ण आहेत. या जिल्ह्यात मजूरांची उपस्थिती १४ हजार असल्याचे शासनाला सादर करण्यात आलेले असताना मजूरा अभावी कामे बंद आहेत हे कारण समितीला संयुक्तीक वाटत नसून त्याबाबत समिती नाराजी व्यक्त करीत आहे. जिल्ह्यामध्ये अनेक कामे विविध स्तरावर अपूर्ण अवस्थेत आहेत. त्यामध्ये कुशल कामे**

**सुद्धा करण्यात आलेली नाहीत ही बाब अतिशय गंभीर आहे. काही अपूर्ण कामे शासनाच्या निर्णयाप्रमाणे अथवा शासनाच्या अन्य योजनेकडे वर्ग करून पूर्ण करण्याचे प्रस्ताव सबंधित यंत्रणेकडून विहीत मुदतीत जिल्हाधिकारी व आयुक्त यांच्याकडे सादर केले जात नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. याबाबतचा अहवाल समितीला ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**(२) सांगली जिल्ह्यातील बिळूर ता. जत येथील विहीरीचे काम जीएसडीएच्या मान्यतेने सुरू करण्यात आले. मात्र सदर विहिरीला पाणी न मिळाल्याने व विहिर काळया माती मधील असल्साने काही कालावधीत ती विहिरभरून गेली त्यामुळे या विहिरीसाठी खर्च केलेला शासनाचा निधी वाया गेला जीएसडीएने विहिरीला मान्यता देताना या विहिरीची चूकीची निवड केली याबाबत समिती नाराजी व्यक्त करते.**

**(३) शासनाच्या कामे वगळण्याच्या धोरणामुळे समितीच्या असे निदर्शनास आले की, अनेक जिल्ह्यात अपूर्ण कामे मोठ्या प्रमाणात आहेत व ती "वगळण्याच्या" निर्णयामुळे शासनाचा पैसा वाया गेला आहे. ही बाब गंभीर आहे. याबाबत समिती अशी शिफारस करते की, रोजगार हमी योजने अंतर्गत घेण्यात येणारी कामे पुर्ण करता येतील अशा पद्धतीने निवडण्यात यावीत.**

**६. गैरव्यवहाराची प्रकरणे :**

रोजगार हमी योजना समितीच्या दिनांक २१ व २२ सप्टेंबर, २०११ रोजी सांगली येथे झालेल्या जिल्हा बैठकीच्या वेळी पुरविण्यात आलेल्या माहिती पुस्तिकेतीत "गैरव्यवहाराची प्रकरणे" यासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, आयुक्त स्तरावर ६ प्रकरणे प्रलंबित आहेत, त्या संदर्भातील माहिती समितीला देण्यात यावी. यावर उपायुक्त, (रोहयो) यांनी सांगितले की, विभागीय स्तरावरील ६ प्रकरणापैकी २ प्रकरणात विभागीय चौकशी विभागीय आयुक्त यांनी कलम १० नुसार करण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच ३ प्रकरणे शासनाकडे १९ सप्टेंबर, २०११ रोजी पाठविण्यात आली आहेत. या २ प्रकरणांची विभागीय चौकशी सुरू असून एका प्रकरणाची एसीबीकडून चौकशी सुरू आहे. अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे स्थानिक स्तर यांची चौकशी कलम १० नुसार सुरू करण्यात आली आहेत. समितीने पुढे विचारणा केली की, रोजगार हमी योजना समितीची बैठक लागल्यामुळे आता ३ प्रकरणे अलीकडेच शासनाकडे पाठविण्यात आली आहेत. आयुक्त व जिल्हाधिकारी यांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, एकूण गैरव्यवहाराची ९ प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यासंदर्भातील सर्व कार्यवाही तातडीने पुर्ण करण्यात यावी. ३ महिन्यांनतर साक्ष घेण्यात येईल त्यावेळी ही ९ प्रकरणे कोणत्या स्तरावर आहेत याची सविस्तर माहिती समितीला लेखी पाठविण्यात यावी. त्यावर जिल्हाधिकारी सांगली यांनी समितीने दिलेल्या सूचनाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे उत्तर दिले.

समितीच्या दिनांक २१ व २२ सप्टेंबर, २०११ रोजीच्या जिल्हा बैठकीत दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने समितीने दिनांक २३ जानेवारी, २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. जिल्हा बैठकीत आश्वासित केल्याप्रमाणे प्रश्नावलीद्वारे समितीने विचारणा केली की, आयुक्त व जिल्हाधिकारी स्तरावर गैरव्यवहारासंबंधीच्या ९ प्रलंबित प्रकरणांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला देण्यात यावी. या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे? नियमानुसार अशी प्रकरणे निकाली काढण्यासाठी किती दिवसांचा कालावधी आवश्यक आहे. त्यापेक्षा जास्त दिवस लागण्याची कारणे काय? याबाबत खालीलप्रमाणे लेखी स्वरुपातील माहिती देण्यात आली आहे.

**(१) जवाहर विहीर दुरुस्ती व नुतनीकरण कार्यक्रमातंर्गत झालेल्या गंभीर अनियमिततेबाबत.**

सन १९९९-२००० जून्या ३७ विहीरीच्या कामांना जिल्हा परिषदेने प्रशासकीय मान्यता दिल्याने व त्यास शासनाने मान्यता दिली आहे. सदर विषयांमध्ये एकूण ३१ विहिरीमध्ये प्रशासकिय अनियमितता झाल्याचे दिसते. सदर प्रकरण गैरव्यवहाराच्या यादीतून कमी करण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांना अहवाल सादर केला होता. तथापि आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्याकडील पत्र क्र.रोहयो/अका-२/कावी/१६५४/२०११, दिनांक २१/९/२०११ मधील सुचनेनुसार या कार्यालयाचे पत्र क्र.रोहयो/कार्या-१३/आरआर-५/२८४/२०११, दिनांक २/११/२०११ ने सदर प्रकरणातील संबंधित अपचारी यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम १० अन्वये परिशिष्ट १-४ मध्ये दोषारोप पत्र तयार करून कागद पत्रासह प्रस्ताव सादर करण्यासाठी कार्यकारी अभियंता, छोटे पाटबंधारे विभाग, जिल्हापरिषद सांगली यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार दिनांक १८/१/२०१३ रोजी प्राप्त झाले असून त्यावर पुढील १५ दिवसांत छाननी करून अहवाल विभागीय आयुक्त कार्यालयाकडे पाठविण्यात येत आहे.

समितीच्या साक्ष बैठकीच्या वेळी उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, जवाहर विहीर दुरूस्ती व नुतनीकरण कार्यक्रमांतर्गत झालेल्या गंभीर अनियमिततेबाबत खुलासा करावा. यावर उपायुक्त, रोहयो यांनी सांगितले की, शासनाचे नवीन विहिरी घेण्याचे आदेश असताना जुन्या अपूर्ण विहिरींवर पैसे खर्च करण्यात आले. या खर्चास शासनाने मान्यता दिल्यानंतर संबंधितांवरील विभागीय चौकशी रद्द करण्यात आली होती. परंतु आयुक्तांनी असे सांगितले की, अशा प्रकारे प्रकरण वगळणे बरोबर नाही. संबंधितांना कमीत कमी शिक्षा प्रस्तावित करावी व तसा प्रस्ताव पाठवावा असे कळविले आहे.

त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, सन १९९९ पर्यंत शासन विहिरींच्या दुरुस्तीसाठी मदत करीत होते. परंतु त्यासंदर्भातील शासन निर्णयास नंतर मुदत वाढ देण्यात आली नाही. जिल्हापरिषदेने जुन्या विहिरींच्या दुरुस्तीसाठी काही निधी खर्च केला. या कामात कोणताही गैरव्यवहार झालेला नाही. फक्त प्रशासकीय अनियमितता झालेली आहे. या प्रकरणातील अपचारी यांचेविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम १० अन्वये परिशिष्ट १ ते ४ मध्ये दोषारोपपत्र तयार करण्याबाबत जिल्हा परिषदेला कळविण्यात आले आहे. त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

**(२) मा.वि.का.अधि.तथा पदसिद्ध उप विकास आयुक्त (रोहयो) यांनी दिनांक १३ फेब्रुवारी २००४ रोजी पा.त.वाघापूर या कामास दिलेली भेट कामावरील हजेरी पट न भरल्याबाबत.**

या कामी आर्थिक अनियमितता व गैरव्यवहार झालेला नसल्याने व श्री पवार, सह अभियंता यांनी जागेवरच खुलासा सादर केलेला आहे. व श्री.हीरोजे, उप अभियंता दिनांक ३ जुलै २००४ रोजी सेवानिवृत्त झाले त्याचां निवृत्तीचा कालावधी ६ वर्षांपेक्षा जास्त असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन (नियम) १९८२ मधील नियम २७ अन्वये कोणतीही कार्यवाही करता येत नसल्याने सदरचे प्रकरण गैरव्यवहार प्रकरणाच्या यादीतुन वगळण्यासाठी अहवाल विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना सादर करण्यात आला होता. तथापि आयुक्त, पुणे, विभाग, पुणे यांच्याकडील पत्र क्र.रोहयो/अका-२/कावी/१६५७/२०११, दिनांक १९ सप्टेंबर २०११ मधील सुचनेनुसार सदर प्रकरणातील अपचारी श्री.पवार, सहा अभियंता यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम १० अन्वये परिशिष्ट १ ते ४ मध्ये दोषारोपपत्र तयार करून कागदपत्रासह प्रस्ताव सादर करण्यासाठी कार्यकारी अभियंता, ल.पा.(स्था.स्त) विभाग सांगली यांना या कार्यालयाचे पत्र क्र.रोहयो/कार्या-१३/आरआर-५/२८३/२०११, दिनांक ३ नोव्हेंबर २०११ अन्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार दिनांक १८ जानेवारी २०१३ रोजी प्राप्त झाला असून त्यावरती पुढील १५ दिवसांत छाननी करून अहवाल विभागीय आयुक्त कार्यालयास पाठविण्यात येत आहे.

समितीच्या साक्ष बैठकीच्या वेळी उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, हे गैरव्यवहाराचे प्रकरण वि.का. अधिकारी तथा उप विकास आयुक्त (रोहयो) यांनी दिनांक १३ फेब्रुवारी २००४ रोजी. पाझर तलाव,वाघापूर या कामास दिलेली भेट, कामावरील हजेरीपट न भरल्याबाबतचे आहे. याबाबत स्पष्टीकरण द्यावे. यावर उपायुक्त, रोहयो यांनी सांगितले की, या कामात अनियमितता झालेली नव्हती. हजेरी पट भरण्यात आले होते. हे प्रकरण वगळण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रस्ताव आला होता. याप्रकरणी सुद्धा आयुक्तांनी सेक्शन १० खाली कमीत कमी (मायनर) शिक्षा करण्याचे प्रस्तावित केले आहे प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी, सांगली यांनी संबंधितांवर कमीत कमी शिक्षा प्रस्तावित करण्यात येईल असे समितीला सांगितले.

**(३) उप विभागीय वन अधिकारी सांगली ७५ वनतळ्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत.**

**(अ)** ७५ वनतळ्यांच्या कामाची संयुक्त मोजणी करून निलंबन निधी निश्चित करून देण्यासाठी अधीक्षक अभियंता, ल.पा.(स्था.स्त)मंडळ पुणे यांना कळविण्यात आले आहे.

**(ब)** श्री.एम.आर.पाटील यांच्याविरुद्ध परिशिष्ट १ ते ४ मधील दोषारोप पत्रे तयार करून या कार्यालयाकडील पत्र क्र.रोहयो/कार्या-१३/आरआर-६०/२०६, दिनांक ५ मे २००६ अन्वये विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना सादर केले आहे.

**(क)** श्री.शेडगे, तत्कालीन उप विभागीय वन अधिकारी, सांगली यांच्याविरुद्ध विटा पोलीस स्टेशनकडील क्र.७३/२००६ नुसार एफआयआर दाखल झाला असून सदर गुन्हा भारतीय दंड विधान कलम क्र.४०९, ४७६, ४७७ (अ) व ३४ खाली दिनांक १८ ऑगस्ट २००६ रोजी नोदंविण्यात आला आहे.

**(ड)** जिल्हाधिकारी कार्यालयाने उप विभागीय वन अधिकारी सांगली यांना दिनांक ७ ऑगस्ट २००६ रोजीच्या पत्रान्वये संबंधित व्यक्तीच्या वरती फौजदारी दाखल करण्यासंदर्भात आदेश दिले होते. त्यानुसार ॲन्टी करपशन ब्युरो यांचेमार्फत सर्व संबंधितांची चौकशी सुरू करण्यात आली आहे.

समितीच्या साक्ष बैठकीच्या वेळी उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, हे प्रकरण ७५ वन तळ्यांच्या कामात झालेला गैरव्यवहारासंबंधीचे आहे. या प्रकरणाची काय सद्य:स्थिती आहे? सन २००६ चे प्रकरण आहे म्हणजे मागील सहा वर्षांपासून हे प्रकरण प्रलंबीत आहे. अशी समितीने विचारणा केली असता, यावर जिल्हाधिकारी, सांगली यांनी सांगितले की, याप्रकरणी एफआयआर दाखल करण्यात आलेला असून चौकशी सुरू आहे.

उपायुक्त, रोहयो यांनी सांगितले की, ॲसीबीकडे कागदपत्रे दिलेली आहेत त्यांनी रक्कम निश्चित केल्यावर संबंधितांवर चार्जशीट दाखल करण्यात येईल. कारण रक्कम निश्चित झाल्याशिवाय चार्जशीट दाखल करता येत नाही. त्यावर समितीने विचारणा केली की, नव्वद दिवसांमध्ये चार्जशीट झाली पाहिजे. त्यावर उपायुक्त, रोहयो यांनी सांगितले की, चार्जशीट दिली नाही तर लगेच जामीन मंजूर होतो. समितीने पुढे विचारणा केली की, असे होत असेल तर आपणास अधिकारी कशाला दाद देतील? त्यावर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, ते व्यक्तीगत या प्रकरणी लक्ष

घालून पुढील कारवाई करण्यात येईल. असीबीशी बोलून मार्ग काढण्यात येईल. त्यासंदर्भात समितीने स्पष्ट केले की, असीबी हे शासनाचे अधिकारी आहेत. तेव्हा याप्रकरणी चौकशी करण्यासाठी सहा वर्षे का लागली याचा खुलासा मागवू शकता. आता चौकशीची काय सद्यःस्थिती आहे ते एका महिन्यात कळविण्याबाबत समितीने निर्देश दिले आहेत असे त्यांना कळवावे.

**(४) पा. त. नेलकरंजी (रामघाट), पा.त. चिंचाळे (गायरान), पा.त. भूड नं.७ अतिवृष्टीने फुटल्याबाबत.**

समाविष्ट अधिकारी यांचेविरूद्धचे परिशिष्ट १ ते ४ मधील दोषारोपपत्र विभागीय आयुक्त,पुणे विभाग, पुणे यांचेकडे या कार्यालयाचे पत्र क्र. रोहयो/ कार्या-१३/आरआर-५/२३९/११ दि.७ डिसेंबर २०११ अन्वये सादर करण्यात आली आहे.

समितीच्या साक्ष बैठकीच्या वेळी उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, पाझर तलाव नेलकरंजी (रामघाट ), पाझर तलाव चिंचाळे (गायरान), पाझर तलाव भूड नं.७ अतिवृष्टीने फुटले याबाबत स्पष्टीकरण द्यावे. जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, हे काम सन १९९३ मध्ये काम पूर्ण झाले होते. १९९४ मध्ये अतिवृष्टीमुळे हे पाझर तलाव फुटले. याप्रकरणी संबंधितांवर दोषारोप सादर करण्यात आलेली आहेत. ६४ हजार रुपये वसूल करण्यात आले आहे.

उपायुक्त, रोहयो यांनी सांगितले की, या प्रकरणामध्ये सहा. अभियंते होते. दोन दिवसांत १४० मी.मी. पाऊस झाला त्यामुळे पाझर तलाव फुटले. या प्रकरणी संबंधितांकडून ६४ हजार रुपये वसूल केलेले आहेत. संबंधित अभियंते हे दिनांक ३१ जून २०११ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत आणि त्यांची विभागीय चौकशी करण्यास सुचविण्यात आले आहे. सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी करता येत नाही. त्यामुळे हे प्रकरण वगळण्याशिवाय पर्याय नाही. ही घटना सन १९९३-९४ मध्ये घडलेली आहे आणि आता सन २०१३ मध्ये या घटनेच्या संदर्भात चर्चा करीत आहोत. या प्रकरणी संबंधितांवर दोषारोप पत्र दाखल करण्यात यावे. असे समितीने स्पष्ट केले असता, जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, या प्रकरणी संबंधितांना शिक्षा झालेली आहे. परंतु ती शिक्षा पुरेशी नव्हती. आम्ही संबंधितांवर जबाबदारी निश्चित करतो.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, संबंधितावर आता जबाबदारी कशी निश्चित करणार आहात? कारण ही घटना सन १९९३-९४ मध्ये घडलेली आहे आणि आता या घटनेच्या संदर्भात चर्चा करीत आहोत. बहुतेक सर्व प्रकरणांच्या बाबतीत असे होते की, संबंधित व्यक्ती सेवेतून निवृत्त होईपर्यंत कोणतीही कारवाई केली जात नाही. जर एखाद्या व्यक्तीकडून गुन्हा घडला तर त्याबाबत संबंधित विभागच चौकशी करतो, अशी स्थिती आहे. खरे म्हणजे अशी घटना घडल्यानंतर ४ वर्षांच्या आत संबंधित व्यक्तीवर दोषारोप पत्र दाखल केले पाहिजे. मागील २० वर्षापासून दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले नाही, यासाठी कोण जबाबदार आहे? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, संबंधित अधिकाऱ्यांचा यामध्येच वेळ गेलेला आहे.

**(५) खानापूर तालुक्यातील तोंडोली खेराडे व इतर १६ रस्ता दुतर्फा वनीकरण कामे-खोटी बनावट हजेरीपत्रकावर नोंदवणे व मजुरांना अकुशल कामाची मजुरी न देणे.**

या प्रकरणी समाविष्ट असणारे एकूण ६ अपचारी यांचेविरूद्ध परिशिष्ट १ ते ४ मध्ये दोषारोपपत्रे तयार करून आयुक्त पुणे, पुणे विभाग, पुणे यांना सादर करण्यात आली होती. त्यावर त्यांचे पत्र क्र. रोहयो/अ.का.२/कावी/२०५१/१२,दिनांक ११ जानेवारी २०१२ अन्वये शेरे पुर्ततेसाठी परत प्राप्त झाले होते. घेण्यात आलेल्या शेऱ्यांची पूर्तता करून फेरअहवाल इकडील पत्र क्र. रोहयो/कार्या-१३/आरआर-५/०७/१२, दिनांक २८ फेब्रुवारी २०१२ अन्वये आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना सादर करण्यात आलेला आहे. प्रकरणी समाविष्ट कामाचा निलंबन निधी (रू.२६,९२,३२१/-) अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे (स्था.स्तर) मंडळ,पुणे यांचेकडील आदेश क्र.१९६/२०१२, दिनांक २ मे २०१२ अन्वये निश्चित करून मिळालेला आहे.

समितीच्या साक्ष बैठकीच्या वेळी उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, याप्रकरणी देखील चार्टशीट तयार करावी लागेल. जिल्हाधिकारी, सांगली यांनी अशी माहिती दिली की, या प्रकरणी चार्टशीट तयार केलेली असून ती शासनाकडे पाठविण्यात आली होती. परंतु त्यातील त्रुटी दूर करण्यासाठी ते परत कार्यालयाकडे पाठविण्यात आले आहे. जे अपचारी आहेत त्यांच्याकडे देखील दोषारोप पत्र पाठवावे लागते. त्यानुसार ते संबंधितांकडे पाठविण्यात आले असून याबाबत तात्काळ कार्यवाही केली जाईल.

**(६) खानापूर तालुक्यात रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड ३० कामे-हजेरीपत्रकात बनावट नाव लिहून बनावट सह्या करून शासन रकमेचा अपहार करणे.**

